पुणे आवृत्ती | Facebook : @dainikjanmanthan | Twitter : @dailyjanmanthan | Instragram : @dainikjanmanthan | .janmanthan.com | आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र. : MAHMAR/2010/35960
ई-मेल आयडी : dailyjanmanthan@gmail.com | डिक्लेरेशन क्र. : SDM/HAVELI/SR/64/2019

२४ जुलै २०२४
■ वार : बुधवार
■ वर्ष : १४ वा ■ अंक क्र. : २२२
■ पृष्ठे : ४

सायं. दैनिक

# जन मंथन

आवाज जनमताचा..!

संस्थापक व संपादक : समीर खान | मुख्य संपादक : आजमतुल्ला खान

किंमत रू. ३/-

ताज्या बातम्या व अधिक माहितीसाठी आमच्या वेबपोर्टला अवश्य भेट द्या..!
www.janmanthan.com

| बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क : | |
|---|---|
| वसीम खान | मो. नं. : ८४८४८९८७८६ |
| आजमतुल्ला खान | मो. नं. : ९७६३१९९९१७ |

**हवामान**
जिल्ह्यात आज
|कमाल : २८.२° |किमान : १९.५°

## संक्षीप्त वृत्त

### काय स्वस्त झालं?

या अर्थसंकल्पानंतर देशात कोणत्या वस्तू व सेवा स्वस्त होणार? कोणत्या गोष्टी महागणार? हा प्रश्न प्रत्येकाच्या मनात असतानाच सीतारामण यांनी अनेक वस्तू आणि सेवांवरील कररचनेत बदलाची घोषणा केली आहे. कर कमी केल्याने काही वस्तू स्वस्त झाल्या आहेत. तर काही वस्तूंसाठी आता आपल्याला अधिक पैसे मोजावे लागणार आहेत. गेल्या वर्षी सादर केलेल्या अर्थसंकल्पानंतर टीव्ही, स्मार्टफोन, कम्प्रेस्ड गॅस व प्रयोगशाळेत तयार केले जाणारे हिरे स्वस्त झाले होते. दुसऱ्या बाजूला सिगारेटच्या किंमती वाढल्या होत्या, विमान प्रवास महागला होता. त्याचबरोबर वस्त्रोद्योगालाही फटका बसला होता.

यंदाच्या अर्थसंकल्पानंतर काय स्वस्त झालं, काय महाग झालं त्याची यादी पाहूया. अर्थमंत्री निर्मला सीतारामण म्हणाल्या, शेतकऱ्यांसाठी आम्ही सर्व प्रकारच्या पिकांची हाय मिनिमम सपोर्ट प्राईस (किमान आधारभूत किंमत किंवा हमीभाव) ठरवली आहे. यामुळे शेतकऱ्याला त्याने केलेल्या खर्चावर ५० टक्के अधिक किंमत मिळेल. अर्थमंत्री निर्मला सीतारामण म्हणाल्या, शेतकऱ्यांसाठी आम्ही सर्व प्रकारच्या पिकांची हाय मिनिमम सपोर्ट प्राईस (किमान आधारभूत किंमत किंवा हमीभाव) ठरवली आहे. यामुळे शेतकऱ्याला त्याने केलेल्या खर्चावर ५० टक्के अधिक किंमत मिळेल.

- अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी मोबाईल फोन व चार्जरवरील कस्टम ड्युटी (सीमाशुल्क) १५ टक्क्यांनी कमी करत असल्याची घोषणा केली आहे. त्यामुळे आता मोबाईल फोन व चार्जर्स स्वस्त होतील.
- सोने व चांदीवरील सीमाशुल्क ६ टक्क्यांनी कमी करण्यात आलं आहे, तर प्लॅटिनमवरील सीमाशुल्कात ६.४ टक्के घट करण्यात आली आहे.
- कर्करोगावरील उपचारांसाठी वापरल्या जाणाऱ्या तीन प्रमुख औषधांना सीमाशुल्कातून सूट देण्यात आली आहे.
- सोलार पॅनेलची निर्मिती करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या काही वस्तूंना सीमाशुल्कातून सूट देण्याचा प्रस्तावही अर्थमंत्र्यांनी यावेळी मांडला.
- फोन व इलेक्ट्रिक वाहनांच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या लिथियन-आयॉन बॅटरीवरील कर कमी करण्याची घोषणा करण्यात आली आहे.
- ई-कॉमर्सवरील टीडीएस रेट १ टक्क्यावरून ०.१ टक्क्यांपर्यंत कमी केला आहे.
- फेरॉनिकेल, ब्लिस्टर कॉपरवरील बेसिक कस्टम ड्युटी हटवण्यात आली आहे.
- चामड्यापासून बनवलेल्या वस्तू देखील स्वस्त होणार आहेत.
- २५ महत्त्वाची खनिजे सीमाशुल्कातून वगळण्यात आली आहेत.
- माशांच्या खाद्यावरील सीमाशुल्क ५ टक्क्यांनी कमी केलं आहे.

### काय महाग झालं?

- नॉन-बायोडिग्रेबल प्लास्टिकच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या अमोनियम नायट्रेटवरील सीमाशुल्क १० टक्क्यांवरून २५ टक्के करण्याचा प्रस्ताव निर्मला सीतारामण यांनी मांडला आहे.
- विशिष्ट दूरसंचार उपकरणांवरील प्राथमिक सीमाशुल्क १० टक्क्यांवरून १५ टक्के करण्यात आलं आहे.

### युवक-विद्यार्थ्यांवर भर

- सर्व औपचारिक क्षेत्रामध्ये नव्याने प्रवेश करणाऱ्यांना १ महिन्याचा पगार तीन समान हप्त्यांत १५ हजार रुपयांपर्यंत देणार.
- पहिली नोकरी करणाऱ्यांचा दरमहा ३ हजार प्रति महिना इपीएफओचा हिस्सा केंद्र सरकार भरणार.
- सरकारी योजनांचा फायदा न मिळणाऱ्या विद्यार्थ्यांना १० लाख रुपयांपर्यंतच्या कर्जात सरकारी मदत, दरवर्षी १ लाख विद्यार्थ्यांना ई-व्हाऊचर.

### शेतकरी

- भाजीपाला उत्पादन वाढवण्यासाठी क्लस्टर योजना आणणार. शेतीतील उत्पादकता वाढवण्यास संशोधनावर भर
- कृषी व सहाय्यक क्षेत्रासाठी १.५२ लाख कोटींची तरतूद
- नैसर्गिक शेतीसाठी १ कोटी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे, अशा शेतीसाठी प्रमाणीकरण, ब्रँडिंगच्या सुविधा पुढील दोन वर्षांत उपलब्ध करून देणे.
- शेतजमिनींना ३ वर्षांत डीपीआय कव्हरेज.

### महिला

- महिला व मुलींसाठी ३ लाख कोटी रुपये खर्चाच्या योजनांची अंमलबजावणी.
- महिलांनी विकत घेतलेल्या मालमत्तांवरील स्टॅम्प ड्युटी कमी करण्यासाठी राज्यांना प्रोत्साहन देणार
- कार्यबळामध्ये महिलांच्या प्रमाणात वाढ व्हावी यासाठी नोकरी करणाऱ्या महिलांसाठी हॉस्टेल स्थापन करणार. त्यासाठी उद्योग क्षेत्राची मदत घेणार.

जन मंथन लक्षवेधी



# खराडीतील पंतप्रधान आवास योजनेत मोठा गैरव्यवहार; सामान्यांचे घराचे स्वप्न धुळीस

# श्रीमंत पात्र; खरे लाभार्थी अपात्र

चाँद शेख : जनमंथन वृत्तसेवा

**पुणे : सर्वसामान्य नागरिकांना परवडणाऱ्या दरात घरे उपलब्ध करून देण्याच्या उदात्त हेतूने सुरू करण्यात आलेल्या पंतप्रधान आवास योजनेत मोठा गैरव्यवहार झाल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. पुणे शहरातील खराडी भागात या योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या घरांमध्ये अपात्र व्यक्तींनी घुसखोरी केल्याचे आढळून आले आहे. या प्रकरणामुळे खऱ्या गरजू लोकांना पंतप्रधान आवास योजनेपासून वंचित राहावे लागत असल्याचे स्पष्ट झाले आहे.**

पुणे महानगरपालिके मार्फत राबविण्यात येत असलेल्या या योजनेचा मूळ उद्देश शहरातील घरविहीन नागरिकांना स्वस्त दरात घरे उपलब्ध करून देणे हा होता. मात्र मिळालेल्या माहितीनुसार या योजनेतील सुमारे ९०% लाभार्थी हे आधीपासूनच स्वतःची घरे किंवा इमारती असलेले आहेत. अर्थात, या अपात्र व्यक्तींनी योजनेतील घरे बळकावली असल्याचे स्पष्ट होते.

खराडीतील प्रकल्पाची सखोल माहिती गोळा करताना आणखी एक धक्कादायक बाब समोर आली. या प्रकल्पातील दोन सोसायट्यांमध्ये जवळपास ७०% रहिवासी हे भाडेकरू असल्याचे आढळून आले. म्हणजेच, ज्यांना या योजनेअंतर्गत घरे मिळाली, त्यांनी ती घरे भाड्याने देऊन अतिरिक्त उत्पन्नाचे साधन म्हणून वापरत असल्याचे दिसून येते.

या संपूर्ण प्रकरणात सर्वात गंभीर बाब म्हणजे पालिका अधिकाऱ्यांची संशयास्पद भूमिका. या सर्व गैरप्रकारांची माहिती पालिका अधिकाऱ्यांना असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. अधिकाऱ्यांच्या मौन संमतीनेच, किंबहुना त्यांच्या आशीर्वादानेच हे सर्व घडत असल्याचा गंभीर आरोप आहे. यामुळे शासकीय योजनेचा उघडपणे गैरवापर होत असून, सरकारी तिजोरीवर अनावश्यक बोजा पडत आहे.

या प्रकरणाचे सर्वात मोठे दुष्परिणाम भोगावे लागत आहेत ते खरोखरच गरजू असलेल्या नागरिकांना. ज्यांच्यासाठी ही योजना मूळात आखण्यात आली, तेच आज या योजनेपासून वंचित राहत आहेत. अनेक कुटुंबे वर्षानुवर्षे भाड्याच्या घरात राहत असून, त्यांना या योजनेतून स्वतःचे घर मिळण्याची आशा होती. मात्र, आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या लोकांनी ही घरे हडप केल्याने त्यांचे स्वप्न अपूर्णच राहिले आहे.

शहर विकास क्षेत्रातील तज्ज्ञ डॉ. सुधीर देवरे यांनी या प्रकरणावर भाष्य करताना म्हटले, ''पंतप्रधान आवास योजनेसारख्या महत्त्वाकांक्षी योजनेची अंमलबजावणी करताना पारदर्शकता व निकषांचे काटेकोर पालन आवश्यक आहे. सध्याच्या परिस्थितीत या योजनेची संपूर्ण पुनर्रचना करून, खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत ती पोहोचेल याची खात्री करणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी तळागाळातील लोकांपर्यंत जाऊन सर्वेक्षण करणे, पात्र लाभार्थ्यांची यादी जाहीर करणे आणि नियमित तपासणी करणे या उपाययोजना राबवाव्या लागतील.''

खराडी येथील रहिवासी यांनी या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना सांगितले, ''आम्ही गेली अनेक वर्षे भाड्याच्या घरात राहत आहोत. पंतप्रधान आवास योजनेत आम्हाला घर मिळेल अशी आशा होती. पण आता कळते आहे की आधीच श्रीमंत असलेल्या लोकांनीच ही घरे हडप केली आहेत. शासनाने याची गंभीर दखल घ्यावी आणि आम्हा गरजूंना न्याय द्यावा.''

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी आता जोर धरत आहे. केवळ वर्तमान प्रकरणातील दोषींना शिक्षा देणे एवढ्यावरच भागणार नाही, तर भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी योजनेच्या अंमलबजावणीत मूलभूत सुधारणा करणे आवश्यक आहे. सामान्य नागरिकांच्या घराच्या स्वप्नाला न्याय मिळावा यासाठी शासन, प्रशासन आणि नागरिक या सर्वांनीच सतर्क राहून प्रयत्न करणे गरजेचे आहे. तरच खऱ्या अर्थाने 'सबका साथ, सबका विकास' हे तत्त्व प्रत्यक्षात उतरेल.आणि ज्या उदात्त हेतूने पंतप्रधान आवास योजनेची निर्मिती करण्यात आली त्याचे सार्थक होईल.

■ **या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन तातडीने कारवाई करण्याची मागणी विविध स्तरांवरून होत आहे. प्रामुख्याने खालील मागण्या पुढे येत आहेत :**

१. प्रकल्पात सध्या राहत असलेल्या सर्व रहिवाशांची, विशेषतः भाडेकरूंची तात्काळ चौकशी करण्यात यावी.
२. योजनेच्या निकषांचे उल्लंघन करून घरे मिळवलेल्या अपात्र लाभार्थ्यांकडून ती घरे तात्काळ परत घेण्याची कारवाई सुरू करावी.
३. या संपूर्ण प्रकरणात सहभागी असलेल्या पालिका अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी.
४. भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी योजनेच्या अंमलबजावणीत आमूलाग्र सुधारणा कराव्यात.







# ना निर्यातीची मुभा, ना हमीभावाची शाश्वती; अर्थसंकल्पात शेतकरी उपेक्षितच!

## अर्थसंकल्पातील दहा मोठ्या घोषणा

- या अर्थसंकल्पानुसार नवीन कर प्रणाली जाहीर झाली आहे. यानुसार आता तीन लाख रुपयांपर्यंत इन्कम असलेल्या नागरिकांना कर भरावा लागणार नाही. तीन ते सहा लाख रुपये उत्पन्न असल्यास आता ५ टक्के कर भरावा लागेल. सात ते दहा लाख रुपये उत्पन्न असल्यास आता १० टक्के कर असेल तर दहा ते बारा लाख रुपये उत्पन्नावर १५ टक्के, बारा ते पंधरा लाख रुपये उत्पन्नावर २० टक्के आणि पंधरा लाख रुपयांपेक्षा अधिक जर उत्पन्न असेल तर ३० टक्के कर भरावा लागणार आहे.
- सोने आणि चांदीवरील कस्टम ड्युटी कमी करण्यात आली. आयात केलेले दागिने स्वस्त होतील. कॅन्सरची औषधे, प्लॅटिनम, मोबाईल फोन, मोबाईल चार्जर, इलेक्ट्रिकल वायर, एक्स-रे मशीन, सोलर सेट, लेदर आणि सीफूड या बजेटमध्ये स्वस्त करण्यात आले आहेत.
- पीएम आवास योजना-शहरी २.० च्या घोषणेअंतर्गत, १ कोटी गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांच्या घरांच्या गरजा १० लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीने पूर्ण केल्या जातील. यामध्ये पुढील पाच वर्षांत २.२ लाख कोटी रुपयांच्या केंद्रीय मदतीचा समावेश असेल.
- केंद्र सरकार २५ हजार गावांमध्ये ऑल वेदर कनेक्टिव्हिटी पुरवणार आहे. यासोबतच पीएम ग्राम सडक योजनेच्या चौथ्या टप्प्यात नवीन रस्तेही बांधले जाणार आहेत.
- पूरग्रस्त बिहारला ११,५०० कोटी रुपयांची मदत. यासोबतच बिहारला महामार्गासाठी केंद्र सरकारकडून २६ हजार कोटी रुपयांची भेट मिळाली आहे.
- नोकरदार लोकांच्या मुलांसाठी **NPS** वात्सल्य सुरू केले आहे. पालकांना या योजनेत गुंतवणूक करता येणार आहे.
- बजेटमध्ये कृषीसाठी १.५२ लाख कोटींची व्यवस्था. तर १० ठिकाणी मोठ्या नागरी सांडपाणी प्रक्रिया करण्याचे काम करण्यात येणार आहे.
- आंध्र प्रदेश राज्याला १५ हजार कोटींचे विशेष आर्थिक पॅकेज.
- सोहरमध्ये इंडस्ट्रीयल पार्क बनवणार, पाच वर्षांत एक कोटी तरुणांना प्रशिक्षण.
- महिला आणि मुलींना लाभ देणाऱ्या योजनांसाठी सरकारने ३ लाख कोटी रुपयांहून अधिक तरतूद करुन ठेवली आहे

**|| नवी दिल्ली : जनमंथन वृत्तसेवा-**

अर्थसंकल्पाच्या आदल्या दिवशी सादर झालेल्या आर्थिक सर्वेक्षणात कृषी क्षेत्रासंदर्भात दोन महत्त्वाचे मुद्दे अधोरेखित झाले. त्यांचा प्रभाव अंदाजपत्रकावर दिसेल अशी आशा होती. पहिला मुद्दा हा शेतीमालाला आंतरराष्ट्रीय बाजारातील भाव मिळू देण्यासंदर्भात होता आणि दुसरा मुद्दा हवामानबदलांच्या संदर्भातील होता. त्यातील दुसऱ्या मुद्द्याचा प्रभाव अंदाजपत्रकातील कृषिसंदर्भातील चर्चेवर जरूर दिसतो पण पहिल्या मुद्द्याचा मात्र अर्थमंत्र्यांच्या भाषणात कुठेही उल्लेख दिसला नाही.

आर्थिक सर्वेक्षणात नोंदवलेला मुद्दा असा की महागाईवर नियंत्रण मिळवण्यासाठी शेतीमालाच्या निर्यातीवर बंधने घालण्यात येतात आणि शेतकऱ्यांना आंतरराष्ट्रीय बाजारातील चढ्या भावाचा फायदा घेता येत नाही. त्याला पर्याय म्हणून या महागाईमुळे ग्रस्त होणाऱ्या गरीब ग्राहकाला विशिष्ट शेतीउत्पादनाचे भाव वाढलेले असताना काही थेट रकमेचे अनुदान देणे आणि मग खुल्या बाजारातील भाव वाढू देणे. या पर्यायाचा उल्लेख आर्थिक सर्वेक्षणात करण्यात आला होता. पण त्याचे कोणतेही प्रतिबिंब अर्थमंत्र्यांच्या भाषणात उमटले नाही.



मोदी सरकार २०१४ साली सत्तेवर आले तेव्हा अशी अपेक्षा व्यक्त होत होती, की हे सरकार खुल्या बाजारात हस्तक्षेप करून शेतमालाचे भाव पडणार नाही. पण तसे झाले नाही. कांद्याच्या बाबतीत निर्यातबंदी लावण्याची सरकारची 'कार्यक्षमता' आणि तीव्रता तर कमालीची होतीच पण फक्त कांदाच नाही तर अनेक पिकांच्या बाबतीत या सरकारने अतिशय त्वरेने निर्यातबंदी लादली. लोकसभा निवडणुकांत ग्रामीण जनतेच्या नाराजीचा मोठा फटका मोदी सरकारला बसला, त्यामागे हेदेखील एक महत्त्वाचे कारण असल्याचे विश्लेषण निकालांनंतर करण्यात आले. या पार्श्वभूमीवर शेतीमालाची खरेदी हमीभावाने करण्यासाठी सरकार मोठी तरतूद करेल अशी अपेक्षा होती. पण अर्थमंत्र्यांच्या भाषणात याचा उल्लेखदेखील नव्हता. डाळी आणि तेलबियांची हमीभावाने खरेदी करण्यासाठी 'जीपीएम आशा' ही योजना कार्यान्वयीत करण्यात आली आहे त्यामध्ये या पदार्थांच्या हमीभावाने खरेदीसाठीच्या निधीमध्ये अत्यल्प वाढ करण्यात आली आहे.

आर्थिक सर्वेक्षणात हवामान बदलामुळे भारतीय शेतीसमोर उभ्या ठाकलेल्या गंभीर आव्हानांचा उल्लेख करण्यात आला आहे. आजवर दुर्लक्षित राहिलेल्या मात्र चांगली पोषणमूल्ये असलेल्या भरड धान्यांचे महत्त्व आता मान्य केले जाऊ लागले आहे. अर्थमंत्र्यांच्या भाषणात हवामान बदलांना काटकपणे तोंड देऊ शकतील अशा या पिकांच्या बियाणांच्या निर्मितीविषयी काहीसा अप्रत्यक्ष उल्लेख करण्यात आला. यात ३२ पिकांच्या सुमारे १०० वाणांची निर्मिती करण्याची घोषणा करण्यात आली. हा नेमकेपणा स्वागतार्ह आहे. हे कसे साधले जाईल, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. कारण अशा अनेक घोषणा पूर्वीदेखील करण्यात आल्या आहेत. त्यांचा पुढील अर्थसंकल्पांतील भाषणांत उल्लेख देखील नसतो. अर्थात हे सर्वच पक्षांच्या सरकारांबाबत म्हणता येईल. पुढील दोन वर्षांत एक कोटी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीकडे वळवण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येईल असे अर्थसंकल्पात आवर्जून म्हटले आहे. यात काही गंभीर प्रश्न निर्माण होतात. भारतातील बहुतांश सर्व पिकांची उत्पादकता इतर प्रगत देशांच्या तुलनेत खूप कमी आहे. नैसर्गिक शेतीमधील उत्पादकता तर अधिकच कमी असते. अशी कमी उत्पादकतेची उत्पादने महाग असणार. अर्थात श्रीमंत वर्गाची देशांतर्गत आणि देशाबाहेरील बाजारपेठ या शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याची योजना सरकारकडे असेल तर ते स्वागतार्हच आहे. पण अशीच घोषणा गेल्या अंदाजपत्रकातदेखील करण्यात आली होती. त्यावेळी तीन वर्षांत एक कोटी शेतकरी नैसर्गिक शेतीकडे वळतील, असा आशावाद व्यक्त करण्यात आला होता. तेव्हा या एक वर्षात काय झाले याचा कोणताही उल्लेख नाही.

कृषीसंशोधनावरील खर्च न वाढणे ही देशाच्या शेतीसमोरील मोठी समस्या आहे आणि कृषी संशोधनात कार्यक्षमता आणणे हेदेखील आव्हान आहे. हवामानबदलांच्या पार्श्वभूमीवर तर या विषयाकडे अतिशय गंभीर्याने पाहणे अपरिहार्य आहे. मात्र आर्थिक सर्वेक्षणात या मुद्द्यावर जे गांभीर्य दिसले, ते अंदाजपत्रकावरील भाषणात दिसले नाही. वास्तविक पाहता केंद्र सरकारने देशातील आजवर दुर्लक्षित राहिलेल्या मात्र चांगली पोषणमूल्ये असलेल्या भरड धान्यांना प्रोत्सहन देण्याचा आपला मानस अनेकदा जाहीर केला आहे. तो अतिशय स्वागतार्हही आहे. या धान्यांच्या उत्पादकतावाढीसाठी संशोधन होणे आणि हमीभावाने खरेदी केली जाणे महत्त्वाचे आहे. याव्यतिरिक्त भरड धान्यांचा समावेश रास्त धान्य वितरण व्यवस्था आणि पोषक आहार योजनेत करून या धान्यांना देशातील प्रमुख पिकांइतके महत्त्व देणे गरजेचे आहे. हे देशातील सर्वांत गरीब शेतकऱ्यांसाठीच नाही तर हवामान बदलांच्या गंभीर संकटाच्या पार्श्वभूमीवर देशातील जनतेच्या हितासाठी आवश्यक ठरणार आहे. यापुढील काळात केंद्र सरकार या दिशेने पावले टाकेल आणि अशी पावले टाकणाऱ्या राज्यसरकारांना पुरेसे आर्थिक साहाय्य देईल अशी अपेक्षा आहे.

# संपादकीय..

## मित्रपक्षांवर खैरात, महाराष्ट्राला ठेंगा!

पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील २०२४-२५ चा पहिला अर्थसंकल्प मंगळवारी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी लोकसभेत सादर केला. मोदी सरकार ज्यांच्या पाठिंब्यावर तरले आहे त्या जेडीयू व टीडीपी या मित्रपक्षांच्या बिहार आणि आंध्र प्रदेश या राज्यांवर अर्थसंकल्पात निधी व योजनांची खैरात करण्यात आली आहे. मात्र, महायुतीचे सरकार असलेल्या महाराष्ट्राच्या तोंडाला सपशेल पाने पुसण्यात आली आहेत. नोकरदारांना अर्थसंकल्पात किरकोळ दिलासा मिळाला आहे. देशातील तरुणांच्या हाताला काम देण्यासाठी पुढील पाच वर्षात रोजगारनिर्मितीच्या योजनांवर २ लाख कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी बजेट मांडताना सांगितले की, विकसित भारतासाठीचा मार्ग अधिक प्रशस्त करणे हे आमचे उद्दिष्ट आहे. कृषी क्षेत्रातील उत्पादन वाढवण्यावर भर देतानाच रोजगार आणि कौशल्य अशा सुधारणावादी धोरणांवरही अर्थसंकल्पात प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. अर्थसंकल्पामध्ये प्राधान्यक्रम देण्यात आले असून त्यानुसार कृषी, रोजगार व कौशल्य, मनुष्यबळ विकास व सामाजिक न्याय, उत्पादन व सेवा, शहरी विकासाला चालना, ऊर्जा सुरक्षा, पायाभूत सुविधा, नवकल्पना-संशोधन-विकास तर अखेरचे प्राधान्य पुढील पिढीतील सुधारणांना असल्याचे अर्थमंत्र्यांनी म्हटले आहे.

### महाराष्ट्राच्या वाट्याला काय?

विदर्भ, मराठवाड्यातील सिंचन प्रकल्पांसाठी ६०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते सुधार योजनेसाठी ४०० कोटी रुपये, सर्वसमावेशक विकासासाठी इकॉनॉमिक कॉरिडॉरला ४६६ कोटी रुपये, पर्यावरणपूरक शाश्वत कृषी प्रकल्पांसाठी ५९८ कोटी रुपये व महाराष्ट्र कृषी आणि ग्रामीण परिवर्तन प्रकल्पांसाठी १५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच 'एमयूटीपी'-३ प्रकल्पासाठी ९०८ कोटी रु., मुंबई मेट्रोसाठी १०८७ कोटी रु., दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉरसाठी ४९९ कोटी रु., एमएमआर ग्रीन अर्बन मोबिलिटीसाठी १५० कोटी रु., नागपूर मेट्रोसाठी ६८३ कोटी, नाग नदी पुनरुज्जीवनासाठी ५०० कोटी, पुणे मेट्रोसाठी ८१४ कोटी, मुळा-मुठा नदी संवर्धनसाठी ६९० कोटी रुपयांची तरतूद केंद्रीय अर्थसंकल्पात करण्यात आल्याचे सांगण्यात येते.

### आंध्र, बिहारवर कृपादृष्टी

अर्थसंकल्पात आंध्र, बिहारला झुकते माप मिळाले असून या राज्यांच्या औद्योगिक विकासावर भर देण्यात आला आहे. बिहारसाठी ५८,९०० कोटींच्या योजना मंजूर करण्यात आल्या आहेत. यापैकी २६,००० कोटी रुपये रस्ते प्रकल्पांसाठी देण्यात येणार आहेत. आंध्र प्रदेशची राजधानी म्हणून अमरावतीच्या उभारणीसाठी केंद्र सरकारने १५ हजार कोटींची तरतूद केली आहे.

### १४ मोठ्या शहरांचा विकास

देशातील वाढते शहरीकरण लक्षात घेता ३० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या १४ मोठ्या शहरांचा विकास करण्याचा निर्णय अर्थसंकल्पातून जाहीर करण्यात आला आहे. तसेच मुद्रा कर्जाची मर्यादा १० वरून २० लाख रुपये करण्यात आली आहे.

### घर विक्रीवर इंडेक्सेशन सुविधा रद्द

आतापर्यंत घर विक्रीवर दीर्घकालीन 'कॅपिटल गेन टॅक्स' लागत होता. त्याला 'इंडेक्सेशन'ची सुविधा दिली जात होती. आता मालमत्ता विक्री भांडवली नफ्यावर १२.५ टक्के नवीन दीर्घकालीन नफा कर लागू होणार आहे. त्यात 'इंडेक्सेशन'ची सुविधा मिळणार नाही.

# बहारदार कविता

## शब्द पाळ तुझे...

माणसाचा जन्म | मिळाला भाग्याने |
तुज समाजाने | शिकविले ||

शब्द पाळ तुझे | निर्लज्ज माणसा |
वागतोस कसा | वेड्यावाणी ||

धोंड्यास पूजता | मिळणार काय? |
अरे तुझी माय | दुःखी होता ||

पावतो ईश्वर | भोळ्या माणसांना |
दिसतो तयांना | सेवेमध्ये ||

दानधर्म कर | सेवक बनून |
विकार त्यागून | जग वेड्या ||

लागलेला डाग | नाही मिटणार |
त्रास जन्मभर | भोगशील ||

म्हणून पावन | ठेव तुझे मन |
करतील जन | राम राम ||

अजु ठेव ध्यानी | गोष्ट आहे खरी |
पांडुरंग हरी | कर्मामध्ये ||

**अजय रमेश चव्हाण (यवतमाळ. मो.८८०५८३६२०७)**

## विकास ..

लोभसवाणा शब्द
सबका हो विकास
ऐकायां अति गोड
वाटे भारी झकास

दिपवून टाक डोळे
लखलखाट प्रभास
आवडते स्वप्न रंजन
सत्यांहून प्रिय भास

कठीण जरी असले
जिंका पूर्ण विश्वास
गुलाम बनो स्वेच्छेने
विचारुन घेती श्वास

पंगतीत पाळा पथ्य
स्वादिष्ट आरंभघास
चटक लावा नशिली
आपला लागे ध्यास

सवय आपली लावा
प्रारंभीपडते सायास
गातीलं भजनमाधुर्ये
सत्यातयेतीलकयास

वर्णनअसले करायचे
हारां सम भासे फास
बंदिस्तसाखळी छान
भलावाटे विजनवास

**- हेमंत मुसरीफ (पुणे. मो. ९७३०३०६९९६)**




# मान्यवरांच्या दृष्टिक्षेपातून अर्थसंकल्प २०२४ -विश्लेषण

**संकलन - संयोजन : सुबोध रणशेवरे (संपर्क : ९८३३१४६३५६)**

लोकसभेच्या निवडणुका पार पडल्यानंतर केंद्रामध्ये एनडीए सरकारची स्थापना होऊन या सरकारचे तिसरे पर्व सुरु झाले. याच तिसऱ्या पर्वातील आगामी २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठीचा पहिला अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज लोकसभेत सादर केला आहे. मध्यमवर्गीय करदात्यांना दिलासा देणारी करप्रणाली, सोन्या चांदीच्या दरात कपात, मोबाईल चार्जर, कर्करोगावरील काही औषधे, इलेक्ट्रिक वाहने स्वस्त करण्यात आली असून प्लास्टिक वस्तू, टेलिकॉम संबंधीची उपकरण महाग झालेली आहेत. याच अर्थसंकल्पावर एक दृष्टिक्षेप टाकून विविध क्षेत्रातील मान्यवरांनी या अर्थसंकल्पाचे केलेले संक्षिप्त विश्लेषण खास त्यांच्याच शैलीत.

यंदाच्या अर्थसंकल्पात एमएसएमई क्षेत्राच्या नियंत्रणमुक्तीमुळे या क्षेत्राची वाढ होऊ शकते. येत्या काही महिन्यात निर्यातीत उल्लेखनीय पुनरुज्जीवन झाल्यास आणि खाजगी गुंतवणूक वाढल्यास सलग चौथ्या वर्षी हि वाढ ७ टक्क्यापेक्षा जास्त होईल अशी आमची अपेक्षा आहे. आर्थिक विसला चालना देण्यासाठी अमृत काळामध्ये नूतनीकरण धोरणात्मक पुशसाठी कृषी, एमएसएमई, खाजगी गुंतवणूक, संक्रमण वित्तपुरवठा, शिक्षण रोजगारात दरी दूर करणे आणि सरकारी धोरणाची प्रभावी अमलबजावणी करणे या सहा क्षेत्रांना चालना मिळून आशादायक बदल घडतील.



**डॉ . विजय कलंत्री**
अध्यक्ष ,ऑल इंडिया असोशिएशन ऑफ इंडस्ट्रीज आणि अध्यक्ष जागतिक व्यापार केंद्र मुंबई

यंदाच्या अर्थसंकल्पात आकर्षक असे काही नसले तरी नोकरदार वर्ग आणि लहान व माध्यम व्यावसायिकांना आर्थिक दृष्टिकोनातून फायदा करून देणारा असा हा अर्थसंकल्प आहे . या अर्थसंकल्पाने मालमत्ता काढून रियालिटी इस्टेट क्षेत्राला मात्र नाराज केले आहे असे वाटते. नव्याने निर्देशित केलेल्या कर प्रणालीमुळे आणि अल्प मुदतीच्या करामुळे मध्यमवर्गीयांना दिलासा देणारा अर्थसंकल्प आहे. कॉर्पोरेट क्षेत्राला देखील जर काही सवलती मिळाल्या असत्या तर अर्थव्यवस्थेला चालना मिळाली असती असे वाटते .



**प्रशांत कपाडिया**
अर्थ विश्लेषक आणि अर्थतज्ज्ञ

विकसित भारतीय अर्थव्यवस्थेचा भक्कम पाया तयार करण्याच्या सरकारच्या प्राधान्यक्रमाला यंदाचा अर्थसंकल्प स्पष्टपणे अधोरेखित करतो. ३. जिडीपी वाटपासह पायाभूत प्रकल्पांवरील कॅपेक्स सरकारच्या प्राधान्यक्रमात सर्वोच्च आहे याचा आम्हाला आनंद आहे. बीईव्ही साठी कमी केलेला जीएसटी दीर्घकालीन चालू ठेवण्याच्या जीएसटीची घोषणा आम्हाला अपेक्षित होती आणि हवामान अनुकूलतेसाठी भांडवलाला मदत करण्यासाठी आणि हवामानात बदल कमी करण्यासाठी हवामान वित्त वर्गीकरण विकसित करणे हे हवामान वचनबद्धता साध्य करण्यासाठीचे सुयोग्य पाऊल आहे.



**संतोष अय्यर**
व्यवस्थापकीय संचालक मर्सिडीज बेन्झ

मोदी ३.० सरकारच्या अंतर्गत, केंद्रीय अर्थसंकल्प भारताच्या रिअल इस्टेट क्षेत्रासाठी एक दूरदर्शी ब्ल्यूप्रिंट अनावरण करतो. अर्थसंकल्प रोजगाराशी निगडित प्रोत्साहनांना प्राधान्य देतो, रोजगार निर्मिती आणि नियोक्ता समर्थन निर्मितीसाठी निधीचे वाटप करतो, वाढीस चालना देण्यासाठी मजबूत कर्मचारी वर्ग सुनिश्चित करतो. उल्लेखनीय म्हणजे, शहरी घरांसाठी १० लाख कोटी रुपयांच्या अभूतपूर्व वाटपाचे उद्दिष्ट १ कोटी शहरी गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांच्या गरजा पूर्ण करणे आहे, ज्यामुळे शाश्वत आणि सर्वसमावेशक शहरी विकासाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

पीपीपी मॉडेल अंतर्गत औद्योगिक कामगारांसाठी वसतिगृहासारख्या निवासस्थानांसह भाड्याच्या घरांची ओळख करून देणे हे शहरी गृहनिर्माण आव्हानांना सामोरे जाण्यासाठी धोरणात्मक दृष्टीकोन दर्शवते. ११.११ लाख कोटींचा कॅपेक्स परिव्यय राखून, पायाभूत सुविधांवर सतत लक्ष केंद्रित करून शहरी विकासाला चालना देण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेला अर्थसंकल्प अधोरेखित करतो. शिवाय, पारदर्शक भाडे बाजार आणि स्वानिधी सारख्या उपक्रमांडरे शहरी हाटांना पाठिंबा देणारे रिअल इस्टेट क्षेत्राला भारताच्या आर्थिक वाढीचे प्रमुख चालक म्हणून स्थान देतात. हा अर्थसंकल्प २०४७ पर्यंत विकसित भारताच्या दिशेने एक स्पष्ट रोडमॅप सादर करतो, ज्यामध्ये रिअल इस्टेट विकासकांना देशाच्या प्रगतीमध्ये योगदान देण्यासाठी आणि त्याचा लाभ घेण्यासाठी अफाट संधी उपलब्ध आहेत.



**धर्मेंद्र रायचुरा**
आशर ग्रुपचे वित्त व्हीपी

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेल्या यंदाच्या वर्षासाठीच्या अर्थसंकल्पात विकसित भारत साध्य करण्यासाठी कृषी क्षेत्रातील उत्पादकता आणि लवचिकतेला प्रोत्साहन देण्याची गरज ओळखण्यात आली आहे. सरकारने कृषी आणि संलग्न क्रियाकल्पांसाठी १. ५२ लाख कोटी रुपयांची तरतूद केली आहे. २०२३-२४ मधील १. ४० लाख कोटींच्या तुलनेत यंदा ८. ५७ टक्क्यांनी वाढ आहे. त्याशिवाय उत्पादकता वाढविण्यावर आणि हवामानाशी लवचिक पिकांची विविधता विकसित करण्यावर भर दिला आहे ज्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढून ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.



**श्रीराम बांगला**
व्यवस्थापकीय संचालक, अन्नपूर्णा स्वाधिश

१० लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह १ कोटी शहरी गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांच्या घरांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अर्थमंत्र्यांच्या अलीकडील अर्थसंकल्पीय घोषणा हे एक महत्त्वाचे वळण आहे. यामुळे शहरी गृहनिर्माण पायाभूत सुविधांमध्ये लक्षणीय सुधारणा होईल, ज्यामुळे अनेकांसाठी स्वस्त घरे मिळण्याची शक्यता निर्माण होईल. पीएम सूर्य घर मुफ्त बिजली योजना, जी एक कोटी कुटुंबांसाठी छतावर सौर पॅनेल बसवण्याचा मानस आहे, ही वीज बिल कमी करण्यासाठी आणि पर्यावरणीय जबाबदारीला प्रोत्साहन देण्यासाठी शहरी घरांमध्ये अक्षय ऊर्जा उपायांचा समावेश करून शाश्वत जीवनासाठी एक प्रशंसनीय पाऊल आहे. याव्यतिरिक्त, राज्यांना सर्वांसाठी उच्च मुद्रांक शुल्क दर कमी करण्यासाठी प्रोत्साहित करणे, महिलांसाठी शुल्क कमी करणे, हा एक प्रगतीशील उपाय आहे. या अर्थसंकल्पात १०० मोठ्या शहरांमध्ये पारदर्शक भाड्याच्या घरांच्या बाजारपेठांवर आणि शहरी विकासासाठी सुधारित सेवांवर भर देण्यात आला आहे, जो शहरी विकासासाठी एक अग्रेषित-विचार करणारा दृष्टिकोन दर्शवितो. ही पावले एकत्रितपणे सर्वसमावेशकता आणि टिकाऊपणावर लक्ष केंद्रित करतात आणि मी आशावादी आहे की या उपक्रमांचा गृहनिर्माण क्षेत्रावर आणि शहरी रहिवाशांच्या जीवनाच्या एकूण गुणवत्तेवर सकारात्मक परिणाम होईल.



**मंजू याज्ञिक**
नाहर ग्रुप उपाध्यक्षा आणि NAREDCO महाराष्ट्राच्या वरिष्ठ उपाध्यक्षा

# सच्चे रंगकर्मी स्वर्गीय जयंत सावरकर!

मराठी चित्रपट आणि नाट्य सृष्टीतील जेष्ठ अभिनेते जयंत सावरकर यांचा आज पहिला स्मृतिदिन. बरोबर एक वर्षापूर्वी म्हणजे २४ जुलै २०२३ रोजी त्यांचे वृद्धपकाळाने वयाच्या ८७ व्या वर्षी निधन झाले होते. जवळपास पाच दशकांहून अधिक काळ रंगभूमीवर आपल्या अभिनयाचे रंग भरणाऱ्या जयंत सावरकर यांच्या निधनाने मराठी रंगभूमीची मोठी हानी झाली. त्यांच्या निधनाने रंगभूमीची अविरत सेवा करणारा सच्चा रंगकर्मी काळाच्या पडद्याआड गेला.

३ मे १९३६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्यात जन्मलेले जयंत सावरकर हे नोकरीसाठी मुंबईत आले. काही काळ त्यांनी मुंबईत नोकरीही केली मात्र अभिनयाचे बाळकडू पिलेल्या जयंत सावरकर यांचे मन नोकरीत रमले नाही. नोकरी सोडून ते नाटकात काम करू लागले. नोकरी सोडून त्यांनी नाटकात काम करणे हे त्यांच्या सासऱ्यांना आवडले नाही. जयंत सावरकर मात्र अभिनय करण्यावर ठाम राहिले. रंगभूमीवर त्यांना जी भूमिका मिळत गेली ती त्यांनी निष्ठेने पूर्ण केली. सुरवातीचे काही वर्ष तर त्यांनी बॅक स्टेज आर्टिस्ट म्हणूनच काम केले मात्र आपल्यालाही आपल्या क्षमतेप्रमाणे नाटकात अभिनय करण्याची संधी मिळेल असा विश्वास त्यांना होता याच विश्वासाच्या जोरावर त्यांना भूमिका मिळत गेल्या.

आपल्याला मिळणाऱ्या भूमिकांची लांबी किती मोठी आहे हे त्यांनी कधीही पाहिले नाही. जयंतराव भूमिकेच्या लांबीपेक्षा भूमिकेची रुंदी पाहत म्हणूनच त्यांना काही नाटकात छोट्या भूमिका मिळाल्या मात्र या छोट्या भूमिकेतही त्यांनी स्वतःच्या अभिनयाची छाप सोडली त्यामुळे लवकरच मराठी रांगभूमिवरील



एक प्रख्यात अभिनेते म्हणून ओळखले जाऊ लागले. पुढे त्यांना अनेक नाटकात मुख्य भूमिका मिळाल्या त्या भूमिकांचे त्यांनी सोने केले. एकच प्याला मधील तळीराम, तुझं आहे तुझ्यापाशी मधील आचार्य, व्यक्ती आणि वल्ली मधील अंतु बर्वा आणि हरितात्या या त्यांनी केलेल्या भूमिका अजरामर ठरल्या. जुन्या काळातील मामा पेंडसे, केशवराव दाते, दत्ताराम यांच्यापासून ते आजच्या काळातील चंद्रकांत कुलकर्णी, मंगेश कदम यासारख्या सर्वच दिग्दर्शकांच्या दिग्दर्शनात त्यांनी काम केले. त्यांनी अभिनय केलेले सौजण्याची ऐसीतैशी, टिळक - आगरकर, ययाती - देवयानी, सूर्यास्त ही नाटके खूप गाजली जवळपास १०० हुन अधिक नाटकात भूमिका केलेल्या जयंतरावांनी ३० हुन अधिक मराठी आणि हिंदी चित्रपटात भूमिका केल्या आहेत. दूरचित्रवाणीवरील काही मालिकातही त्यांनी भूमिका केल्या आहे. नाटक, चित्रपट, मालिका अशा तिन्ही ठिकाणी आपल्या अभिनयाचे रंग भरणारे जयंतराव मात्र प्रेक्षकांना भावले ते नातकातच! सहज सोपा अभिनय करून प्रेक्षकांची मने जिंकण्याची त्यांची खासियत होती म्हणूनच त्यांचा अभिनय पाहताना हा माणूस आपल्या घरातीलच एक व्यक्ती असल्याचा भास प्रेक्षकांना होत असे. त्यांच्या अभिनय कलेसाठी त्यांना अनेक मानाचे पुरस्कारही मिळाले आहेत. अखिल भारतीय नाट्य परिषदेने त्यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरवले आहे. १९९७ साली झालेल्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले आहे.

एक छोटा माणूस या नावाने त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले आहे. त्यांच्या निधनाने पाच दशकांहून काळ रंगभूमीची अविरत सेवा करणारा सच्चा रंगकर्मी काळाच्या पडद्याआड गेला आहे. जेष्ठ रंगकर्मी जयंत सावरकर यांना प्रथम स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५

# स्वत:वर प्रेम करा आणि काळजी घ्या!

### आंतरराष्ट्रीय स्वतःची काळजी दिवस


**निरोगी जीवनशैलीसाठी- फॉर अ हेल्दी लाइफस्टाईल- स्वत:ची काळजी घेणे खूप महत्वाचे आहे. आजकाल व्यस्त जीवनात आपण स्वतःची काळजी घेण्यास दुर्लक्ष करतो. आपण प्रत्येक काम खूप मेहनत आणि वेळ देऊन करतो. पण, जेव्हा स्वतःची काळजी घ्यावी लागते तेव्हा आपण त्याकडे दुर्लक्ष करतो. यामुळे नंतर अनेक समस्या निर्माण होतात. स्वतःवर प्रेम करा. काळजी घ्या, वेळ काढा आपल्यासाठीच सेल्फ केअर डे का साजरा केला जातो, त्याचा इतिहास आणि महत्त्व काय, जाणून घेऊ या.**

दुर्लक्षामुळे केवळ शारीरिकच नाही तर मानसिक समस्या-मेंटल प्राब्लेम्सनाही सामोरे जावे लागते. त्याचाही वाईट परिणाम आपल्या नात्यावर होतो. अशा स्थितीत स्वत:ची काळजी घेणे आवश्यक आहे. बदलत्या जीवनशैलीत तर, स्वत:ची काळजी घेणे खूप गरजेचे आहे. हे आपल्याला निरोगी आणि आनंदी ठेवते. यासाठी दरवर्षी २४ जुलै रोजी आंतरराष्ट्रीय सेल्फ केअर डे साजरा केला जातो. जाणून घेउया, या दिवसाचा उत्सव कधीपासून सुरू झाला आणि या दिवसाचे महत्त्व काय आहे. आज रोजी आंतरराष्ट्रीय सेल्फ केअर डे साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्याचा उद्देश स्वत:ची काळजी घेणे हा आहे. चांगल्या जीवनशैलीसाठी स्वतःची काळजी घेणे खूप महत्वाचे आहे. आपल्याला शारीरिक, मानसिक आणि भावनिकदृष्ट्या स्वतःची काळजी घेणे आवश्यक आहे. या कारणास्तव, आंतरराष्ट्रीय सेल्फ केअर फाऊंडेशनने सण २०१४मध्ये हा दिवस साजरा करण्यास सुरुवात केली. ही यूके स्थित एक धर्मादाय संस्था आहे. या फाउंडेशनचा असा विश्वास आहे की, जेव्हा प्रत्येक व्यक्ती प्रथम स्वतःची काळजी घेते तेव्हा निरोगी समाजाची सुरुवात होते. कोविड-१९ महामारीच्या काळात विषाणूपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी, आपल्याला स्वतःची खूप काळजी घ्यावी लागली, यापुढे देखील अशीच काळजी घेणे काळाची गरज आहे.

रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी सकस आहार घ्यावा, व्यायाम करावा आणि स्वतःला निरोगी ठेवावे. त्यामुळे आपला अनेक आजारांपासून बचाव होईल. सोरायसिस आणि मानसिक आरोग्य तज्ञांचा प्रभावी व्यवस्थापनासंदर्भात अत्यंत महत्वाचा सल्ला आहे.

माता, भगिणींनो चांगला आहार घ्या आणि अधिक काळ जगा! समृद्ध आहारानं वाढतं स्त्रीयांचं आयुर्मान; संशोधनातली माहिती. मलेरिया झाल्यास पपई खावी; गंभीर आजारासाठी फळे आहेत फायदेशीर! नकारात्मकतेपासून दूर राहावे, निसर्गाच्या जवळ जावे, त्वचेची काळजी घ्यावी, योगासने करावीत, व्यायाम करावे, निरोगी रहावे, चांगली आणि गाढ झोप घ्यावी, जीवनाचा आनंद घ्यावा, आरोग्य तपासणी करावी, पुस्तके वाचावी आणि थोडा वेळ एकांतात घालवावा.

हा दिवस स्वतःवर प्रेम आणि आपल्या शरीराची आणि काळजीच्यापर्यायासाठी योग्य आहे. मागील वर्षाची थीम होती- लवचिकता, अनुकूलता आणि प्रतिकूलतेने भरभराट लोकांमध्ये लवचिकता निर्माण करण्यासाठी तीव्र निषेध, जे व्यक्तींना त्यांचे व्यवस्थापन करण्यास, नकारात्मक भावना, शारीरिक आणि मानसिक आरोग्य राखण्यासाठी मदत करू शकते. प्रत्येक दिवशी



स्वत:ची काळजी घेणे निवडले तरी, काही स्वयं-कळजीच्या गोष्टी आपण सुरू करू शकतो. या वर्षापासून केअर डे कसे हे स्पष्ट कराल. येथे हे एक साधे मार्गदर्शन आहे. वेलनेस आणि सौंदर्य जे विकते त्या विरुद्ध, स्वतःची काळजी विस्तृत किंवा फॅन्सी आवश्यक नाही. स्वतःसाठी वेळ शोधावा. हे आपल्या बोलण्यावरून स्वतः साठी वेळ काढण्याइतके असू शकते. दिवसातून फक्त एक तास का असेना, आमच्या कॅलेंडरमध्ये आम्हाला आनंद देण्यासाठी काही वेळ शेड्यूल करुया. याचा अर्थ असा असू शकतो की आमची वेब सिरीज पाहणे, एखादे पुस्तक वाचणे, हे न करण्यासाठी लांब चालणे. आपण पौष्टिक आहार घ्यावा. जाणकारांनी म्हटल्याप्रमाणे, स्वतः ची काळजीही फक्त बबल बाथ आणि फेस मास्कच्या पलिकडे आहे.

निरोगीपणाच्या इतकेच आणि प्रभावी हे स्वतःच्या काळजीच्या पैलूंपैकी एक आहे. अधिकतर पालेभाज्या, ताजी फळे आणि संपूर्ण धान्य आम्हाला समतोल आहाराने उर्जा निश्चितच मिळेल, पण आमचे आरोग्यही संपूर्ण असेल. त्याचप्रमाणे आपण आनंद घ्यावा. अन्नापासून वंचित राहणे विसरावे- जसे की आमचा आवडता पदार्थ झाला नाही म्हणून आनंद नसतो. तथापि, अतिरेक करू नका आणि संयमाचा सरावही करू नका. रोज व्यायाम करावा. नियमित व्यायाम तंदुरुस्तीची गती वाढवतो आणि तगण्याची क्षमता निर्माण करण्यात मदत होते, ते डोपामाइन आणि ऑक्सिटोसिन, कारण ल-गुड आरोग्याची मानसिकता कमी करते आणि मानसिक संतुलन बिघडते. सुधारणे देखील मदत करते. आमच्या कुटुंबाशी आणि मित्रांबद्दल संपर्कात राहण्याचा हा एक चांगला मार्ग आहे, विशेषत: जर आपण समूह सहभाग घ्यावा. आपण लक्षात ठेवा- व्यायामासाठी परिपूर्ण फिटनेस दिवस किंवा जिममध्ये जाण्याची आवश्यकता नाही. याचा अर्थ तुमची फक्त दिवसेंदिवस पायरी मोजणे किंवा योगा, पोहणे किंवा नृत्य या व्यायामासाठी शारीरिक व्यायाम गरजेचा ठरतो.

आपल्या सहाय्याने माहिती पुरेशी पाहणे हे चांगले आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी आहे, आपण रात्री ७-८ तास झोपेचे लक्ष्य ठेवले पाहिजे. पूर्णपणे स्वच्छतेचा सरावा करून कुटुंबियांना सहभागी करून घेणे, आजारी स्वभावींचा स्वभाव सुधारते. साधा ताप, खोकला, खिळा टोचणे, चट्टा, फोड येणे, याकडे दुर्लक्ष करून चालत नाही. पुढे जाऊन मलेरिया, दमा, धनुर्वात, भयंकर त्वचारोग अशा विकारांच्या समस्या उद्भवू शकतात.

बौद्ध धर्मग्रंथ माइंडफुलनेस स्पष्ट करतात. तिची व्याख्या त्याच्या उद्देशाशी सरेखित करते. आम्हाला अधिक स्पष्टपणे पाहण्यासाठी मदत करण्यासाठी, जीवन आपल्यावर काय फेकते त्याला अधिक प्रभावीपणे प्रतिसाद आणि शेवटी अधिक शहाणपणाने निवड करा. हे फोक आणि एकाग्रता सुधारण्यासाठी, व्यवस्थापित करण्यात सकारात्मक आणि भावना वाढवण्यास मदत करते. तुम्ही श्वासोच्छवासाचे व्यायाम, ध्यान, योग किंवा सकारात्मक साधनांच्या मदतीने अंतर्मनाशी संपर्क साधून अंतरिक शक्तीचा उपयोग करू शकता. !! आंतरराष्ट्रीय स्वतःची काळजी दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!



**कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी**
मु. पो. ता. जि. गडचिरोली
फक्त व्हॉ. नं. ९४२३७१४८८३.

# राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष एम. व्यंकटेशन यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस भेट

॥ पिंपरी : जनमंथन वृत्तसेवा-

नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून सफाई कर्मचाऱ्यांचे योगदान अत्यंत महत्वाचे असून प्रत्यक्ष कामातून ते समाजासमोर आदर्श उभा करत असतात. सेवा बजावताना या कर्मचाऱ्यांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देऊन त्यांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी प्रशासकीय यंत्रणांनी पुढाकार घ्यावा, अशी सूचना राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष एम. व्यंकटेशन यांनी केली.

राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष एम. व्यंकटेशन यांनी आज पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस भेट देऊन पिंपरी चिंचवड महापालिका सेवेत कायम तसेच कंत्राटी असलेल्या सफाई कर्मचाऱ्यांशी संबंधित विविध विषयांचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. तसेच विविध संघटनाकडून बैठकीत प्राप्त झालेल्या सूचनांबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश देखील एम. व्यंकटेशन यांनी दिले.

महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात झालेल्या या आढावा बैठकीस राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाच्या अध्यक्षांचे खाजगी प्रधान सचिव शशांक सिंह यांच्यासह महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, सहशहर अभियंता संजय कुलकर्णी, उपआयुक्त विठ्ठल जोशी, संदीप खोत, राजेश आगळे, अण्णा बोदडे, क्षेत्रीय अधिकारी सुचेता पानसरे, अमित पंडित, डॉ.अंकुश जाधव, उमेश ढाकणे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, सहायक आयुक्त तानाजी नरळे, अजिंक्य येळे, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, यांच्यासह महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापक राकेश बेद, पुणे जिल्हा दक्षता समितीचे सदस्य अॅड. सागर चरण यांच्यासह सर्व सहायक आरोग्याधिकारी, सफाई कर्मचारी तसेच संबंधित सफाई ठेकेदार उपस्थित होते.



एम. व्यंकटेशन यांनी महापालिका प्रशासनाला सफाई कर्मचाऱ्यांना उद्भवणाऱ्या समस्यांबाबत विविध सूचना केल्या. सफाई कर्मचाऱ्यांच्या तक्रारींना प्राध्यान देवून त्या वेळेत सोडविल्या गेल्या पाहिजेत, सफाई कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेत अदा करावे, सफाई कर्मचाऱ्यांना वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणांचे वितरण विहीत वेळेत करावे, सफाई कर्मचाऱ्यांचा आरोग्य विमा काढून त्यांची आरोग्य तपासणी देखील करावी, प्रत्येक सफाई कर्मचाऱ्यांच्या ओळखपत्रावर त्यांच्या रक्तगटासह विमा पॉलिसी क्रमांक, आपत्कालीन संपर्क क्रमांक आदी महत्वाच्या बाबी आवर्जून नमूद कराव्यात. सर्व कर्मचाऱ्यांना वेतन प्रमाणपत्र वेळेत देण्यात यावे, वारसाहक्क आणि अनुकंपा तत्वावर सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना देण्यात येणारे लाभ आणि नोकरी याबाबत संबंधित कर्मचाऱ्यांच्या वारसांना माहिती देऊन अशी प्रकरणे वेळेत निकाली काढावीत, महिला विषयक तक्रार निवारण करण्यासाठी विशाखा समितीबद्दल सर्व महिला सफाई कर्मचाऱ्यांना माहिती अवगत करावी आदी सूचना एम. व्यंकटेशन यांनी बैठकीत दिल्या.

आयुक्त शेखर सिंह यांनी महापालिका सफाई कर्मचाऱ्यांना देत असलेल्या विविध सेवा सुविधा आणि योजनांबद्दल माहिती दिली. कोणतीही प्रक्रिया राबविताना त्यातील उणीवा दूर करणे आवश्यक असते. सफाई कर्मचाऱ्यांच्या संदर्भातील सर्व समस्या आणि त्यांना उद्भवणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी महापालिका प्रशासन कटिबद्ध असून त्यासाठी पुढाकार घेतला जाईल, असे आयुक्त सिंह यांनी यावेळी सांगितले. पिंपरी चिंचवड शहरात महापालिकेच्या वतीने राबविण्यात आलेल्या स्वच्छ भारत अभियानातील सफाई कर्मचाऱ्यांचे योगदान उल्लेखनीय होते, त्यामुळे शहराचे आरोग्य उत्तम राखण्यास मदत झाली आहे. सफाई कर्मचाऱ्यांसाठी महापालिकेच्या वतीने विविध योजना राबविण्यात येत असून त्यांना विविध सुविधा देण्यासाठी देखील महापालिकेने नियोजन केले आहे. या सफाई कर्मचाऱ्यांच्या जीवनाचा दर्जा उंचावण्यासाठी महापालिका विविध उपक्रम राबवित असून त्यांच्या पाल्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी मोफत विविध शैक्षणिक कौशल्य विकास अभ्यासक्रमाचे कोर्सेस सुरू करण्यात आले आहेत, अशी माहिती आयुक्त सिंह यांनी दिली.

सफाई कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या सुविधांबाबत अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे माहिती दिली. सफाई कर्मचाऱ्यांसाठी वेळोवेळी आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करणे, वैयक्तिक संरक्षणात्मक साहित्याचे वाटप वेळेत करणे आदी बाबींवर महापालिकेने लक्ष केंद्रित केले आहे. शिवाय कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांच्या वेतनासह त्यांचे विविध प्रश्न आणि तक्रारी सोडविण्यासाठी संबंधित ठेकेदाराला निर्देश देवून त्याची पुर्तता करण्यासाठी महापालिका प्रशासनाच्या वतीने पाठपुरावा केला जातो, असेही त्यांनी यावेळी सांगितले. महापालिकेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना, आरोग्य विमा योजना, श्रमसाफल्य योजना, शैक्षणिक आर्थिक सहाय्य योजना तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ सफाई कर्मचाऱ्यांना देण्यासाठी महापालिकेने केलेल्या कार्यवाहीची माहिती दिली. दरम्यान, वारसा हक्क आणि अनुकंपा तत्त्वावर ३ सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना महापालिका सेवेत घेण्यात आले असून याबाबतचे नियुक्तीपत्रक त्यांना एम. व्यंकटेशन यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आले.

बैठकीत विविध संघटनांनी देखील विविध प्रश्न मांडले. बैठकीचे सुत्रसंचालन उप आयुक्त अण्णा बोदडे यांनी केले तसेच आभारही मानले.

# ताथवडे येथील विविध विकासकामांच्या नियोजनासंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतली आढावा बैठक

॥ पिंपरी : जनमंथन वृत्तसेवा-

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करून शहरातील नागरी सुविधा निर्मितीचे योग्य नियोजन व्हावे यासाठी ताथवडे येथील पशुसंवर्धन विभागाच्या जमिनीवर प्रस्तावित स्पाईन रस्ता, सांडपाणी प्रक्रिया केंद्र (एसटीपी) विकसित करण्यासह त्या जमिनीवर वाढीव नागरी सुविधा उभारण्यासाठीचा एकत्रित प्रस्ताव सादर करावा. त्या जमिनीचा मोबदला पशुसंवर्धन विभागास देऊन महानगरपालिकेने जमीन ताब्यात घ्यावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिले.

उपमुख्यमंत्री पवार यांनी मंत्रालयात आज ताथवडे (जि. पुणे) येथील पशुसंवर्धन विभागाच्या जमिनीवर बांधण्यात येणाऱ्या स्पाईन रस्ता आणि सांडपाणी प्रक्रिया केंद्राबाबतच्या कामांचा आढावा घेतला. या बैठकीस महसूल व पशुसंवर्धन विभागाचे अपर मुख्य सचिव राजेशकुमार, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. के. एच. गोविंदराज, पुण्याचे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, पशुधन विकास मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शितलकुमार मुकणे उपस्थित होते. पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, पशुसंवर्धन आयुक्त कौस्तुभ दिवेगावकर आदी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.



उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, ताथवडे परिसरासह पिंपरी-चिंचवड महापालिका आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रात लोकसंख्या वेगाने वाढत आहे. या क्षेत्रात विविध उद्योग घटकांसह नवीन आयटी कंपन्याही येत आहेत. या सर्वांचा विचार करता ताथवडे येथील पशुसंवर्धन विभागाच्या जागेवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमार्फत स्पाईन रस्ता आणि मलनिंस्सारण प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात येणार आहे. त्यामुळे शहराच्या विकास आराखड्यात ताथवडे येथील जागेचा समावेश करण्यात आला आहे. या जमिनीवर नागरी सुविधांचे काही आरक्षण टाकण्यात आले आहेत. पीएमआरडीए क्षेत्राचा विचार करता ताथवडे येथील मध्यवर्ती ठिकाणी मोठ्या प्रमाणात जागा उपलब्ध आहे.

आवश्यक असणारी जागा महानगरपालिकेला हस्तांतरित करण्यास पशुसंवर्धन विभाग सकारात्मक आहे. त्यामुळे महानगरपालिकेला आवश्यक असणाऱ्या नागरी सुविधांसाठी लागणाऱ्या जमीन हस्तांतरणासंदर्भातील प्रस्ताव तातडीने पशुसंवर्धन विभागास सादर करावा. पशुसंवर्धन विभागामार्फत जमिनीचे मूल्यांकन करून मोबदला निश्चित करण्यात येईल. हा मोबदला भरून महानगरपालिकेने जमीन लवकरात लवकर ताब्यात घ्यावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री पवार यांनी दिले.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, ताथवडे परिसरासह पिंपरी-चिंचवड येथील वाहतूक कोंडीतून नागरिकांची सुटका व्हावी यासाठी वाल्हेकरवाडी चौक ते औंध-रावेत रस्त्यावरील डेअरी फार्म चौक ताथवडे पर्यंतचा ४५ मीटर स्पाईन रस्ता प्रस्तावित करण्यात आला आहे. रस्त्याचे काम तातडीने सुरु करणे आवश्यक असल्याने जमीन हस्तांतर प्रक्रिया गतीने पार पाडावी. त्याचप्रमाणे येथील जमिनीवर २० एमएलडी क्षमतेचा मैला शुद्धीकरण प्रकल्प उभारण्यात येणार आहे. भविष्यात जास्त क्षमतेचा प्रकल्प उभारावयाचा असल्यास मध्यवर्ती ठिकाणी जमीन मिळण्यात अडचणी येतील. त्यामुळे प्रकल्पाच्या भविष्यातील क्षमता वाढीच्या दृष्टीने अधिकची जमीन संपादित करून घ्यावी. या ठिकाणी स्पाईन रस्ता, उड्डाणपूल, एसटीपी आणि इतर विकास कामांसाठी १३ एकर जागेचा प्रस्ताव आहे. आवश्यकतेनुसार आत्ताच या क्षेत्रफळात वाढ करून नवीन प्रस्ताव पाठवावा. महानगरपालिकेने या जागेच्या वापराचा सविस्तर आराखडा तयार करावा, अशा सूचना उपमुख्यमंत्री पवार यांनी केल्या.

# वेळेचे व्यवस्थापन, नव तंत्रज्ञान आत्मसात करा - डॉ. सुधीर हसमनीस

## पीसीयू मध्ये एमबीएच्या विद्यार्थ्यांचा 'दीक्षारंभ' सोहळा उत्साहात संपन्न

॥ पिंपरी : जनमंथन वृत्तसेवा-

उज्वल भविष्यासाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन शिक्षण घेताना वेळेचा सदुपयोग करून नवीन तंत्रज्ञान आणि सामाजिक बदलांचा अभ्यास केला पाहिजे. तरच पुढील आयुष्यात यशस्वी व्हाल असा कानमंत्र टाटा मोटर्सचे निवृत्त महाव्यवस्थापक डॉ. सुधीर हसमनीस यांनी विद्यार्थ्यांना दिला.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयु) साते मावळ येथील स्कूल ऑफ मॅनेजमेंटच्या वतीने (शैक्षणिक वर्ष २०२४-२५) एमबीए विद्यार्थ्यांसाठी 'दीक्षारंभ' सोहळ्यात डॉ. हसमनीस यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फूड टेक्नॉलॉजी, उद्योजकता आणि व्यवस्थापन विभाग अधिष्ठाता प्रा. डॉ. सुनील पारीक, ग्लोबल हेड लर्निंग अँड डेव्हलपमेंट, बिझनेस परफॉर्मन्स, टॅलेंट मॅनेजमेंट आणि एमएसएन लॅब्स ग्रुपचे संचालक शिवानंद मोहन, पीसीयुच्या प्रभारी कुलगुरू डॉ. मणीमाला पुरी, प्र कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे, व्यवस्थापन विभाग अधिष्ठाता डॉ. अजय शर्मा, कृषी व्यवसाय आणि फार्मास्युटिकल व्यवस्थापन विभाग अधिष्ठाता डॉ. अमित पाटील, विपणन विभागाचे जमीर मुल्ला आदी उपस्थित होते.




बदलत्या व्यवसायातील परिस्थितीशी जुळवून घेण्याची गरज, सर्वांगीण विकासाचे महत्त्व, आणि नवोपक्रम आणि उद्योजकता, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक वाढीला सर्वोच्च प्राधान्य पीसीयू देत आहे असे डॉ. मणिमाला पुरी यांनी सांगितले. आधुनिक व्यवसायाच्या यशस्वीतेसाठी नाविन्य आणि उद्योजकता महत्त्व विद्यार्थ्यांना आत्मसात करण्यास डॉ. पारीक यांनी प्रोत्साहित केले. त्यांनी व्यवस्थापन पद्धतींचे भविष्य घडवण्यात तंत्रज्ञानाची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित करून विद्यार्थ्यांना सज्ज होण्याचे आवाहन डॉ. पारीक यांनी केले संघटनात्मक संस्कृतीला आकार देण्यासाठी एचआरची विकसित भूमिका, टॅलेंट मॅनेजमेंटचे महत्त्व आणि व्यवसायाच्या कामगिरीवर शिक्षण आणि विकासाचा बदल स्वीकारण्यास व्यावसायिक प्रवासात जुळवून घ्यावे असे शिवानंद मोहन यांनी मार्गदर्शन केले. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. स्कूल ऑफ मॅनेजमेंट चे एचओडी डॉ. अजय शर्मा यांनी स्वागत केले. डॉ. अमित पाटील यांनी आभार मानले.

# यशदा येथे पशुगणनेसाठी राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन

॥ पुणे : जनमंथन वृत्तसेवा-

राज्यात २१ व्या पशुगणनेस १ सप्टेंबरपासून आरंभ होत असून त्या पार्श्वभूमीवर २५ जुलै रोजी यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) येथे राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती पशुसंवर्धन आयुक्तालयाने दिली आहे.

या कार्यशाळेस केंद्र शासनाच्या सांख्यिकी विभागाचे सांख्यिकी सल्लागार जगत हजारिका, संचालक व्ही. पी. सिंह, केंद्रीय पशुसंवर्धन विभाग संचालक बी. पी. मिश्रा, प्रधान शास्त्रज्ञ डॉ. संजीव सिंह यांच्यासह राज्याच्या पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त कौस्तुभ दिवेगावकर उपस्थित राहून प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करणार आहेत.

या कार्यशाळेमध्ये केंद्र शासनाचे वरिष्ठ अधिकारी यांचेकडून महाराष्ट्र राज्यातील तसेच दमण व दिव आणि दादर नगर हवेली केंद्रशासित प्रदेशांतील राज्य पशुगणना अधिकारी, जिल्हा पशुगणना अधिकाऱ्यांना २१ व्या पशुगणनेचे विकसित मोबाईल ॲप, वेब आधारित आणि डॅशबोर्ड निरीक्षण याविषयी प्रशिक्षण देणार आहेत.

महाराष्ट्र राज्य हे पशुधनाच्या बाबतीत संपन्न राज्य आहे. पशुपालन ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असून देश- राज्याच्या अर्थव्यवस्थेमध्ये याचे लक्षणीय योगदान आहे. शासनाला नियोजनासाठी पायाभूत सांख्यिकी माहितीची अत्यंत आवश्यकता असते. अशी पायाभूत माहिती ही गणनेच्या स्वरुपात गोळा केली जाते. पशुधनांच्या निरंतर विकासासाठी चांगल्या योजना आखण्यासाठी पशुगणना महत्त्वपूर्ण भूमिका निभावते.

देशात सन १९१९-२० पासून पशुगणनेस सुरुवात झाली. तेंव्हापासून दर ५ वर्षांनी पशुगणना घेण्यात येत आहे. सन २०१९ मध्ये २० वी पशुगणना संपन्न झाली. या पशुगणनेमध्ये प्रथमच प्रजाती व ग्रामीण आणि नागरी क्षेत्रनिहाय पशुधनाची आकडेवारी गोळा करण्यात आली. २० व्या पशुगणनेच्या अहवालानुसार राज्यामध्ये एकूण ३ कोटी ३० लाख ८० हजार इतके पशुधन असून मागील पशुगणनेच्या तुलनेत १.८३ टक्क्यांची वाढ झालेली आहे.

पशुधनामध्ये देशामध्ये महाराष्ट्र राज्य ७ व्या क्रमांकावर आहे. तसेच कुक्कुट व कुक्कुटादी पक्षी यामध्ये ५ व्या क्रमांकावर आहे, अशी माहिती पशुसंवर्धन आयुक्तालयाचे सहआयुक्त प्रकाश आहिरराव यांनी दिली आहे.

# रसायनमुक्त उत्पादनांतून अब्जावधी डॉलरच्या व्यवसायाचे लक्ष्य

## राजगंगा समूहाचे राजेराम घवाटे यांचे मुख्य धोरणतज्ज्ञ राजेश शुक्ला यांच्यासह यश

॥ पुणे : जनमंथन वृत्तसेवा-

निरोगी आणि रसायनमुक्त उत्पादनाची खात्री देऊन नाशिकचा राजगंगा समूह जगभरातील सेंद्रिय अन्नाची वाढती मागणी पूर्ण आहे. रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर न केलेले खाद्यपदार्थ निर्यात करून राजगंगा समूहाने गेल्या चार वर्षांत अंदाजे १३८ कोटी रूपयांचे साध्य केले आहे. आता कंपनी पुढील पाच वर्षांत १० अब्ज अमेरिकी डॉलरचे मूल्यांकन गाठण्याचे धाडसी कॉर्पोरेट लक्ष्य बाळगून आहे. या दिशेने पावले टाकत राजगंगा ग्रुपला जागतिक पातळीवर नेण्याच्या उद्देशाने राज्यात नुकतीच पुणे, शिरूर आणि नाशिक येथे कार्यक्रमांची मालिका आयोजित करण्यात आली होती.

व्हेंचर स्टुडिओ कॅपिटल टीम आणि जागो नारी यांनी या कार्यक्रमाला पाठिंबा दिला होता. नवीन रणनीतींवर चर्चा, नवीन उत्पादनांची सुरूवात आणि त्यानंतर संपूर्ण तज्ज्ञांच्या टीमकडून कॉलेज आणि शाळेच्या प्रकल्पांची पाहणी तसेच विठेवाडी (लोहोणेर), ता. देवळा, जि. नाशिक येथील वसंतरावदादा पाटील सहकारी साखर कारखान्याला भेट असे या कार्यक्रमांचे स्वरूप होते. कंपनीला जागतिक स्वरूप देणे आणि तिला भारतातील सर्वोत्तम कंपनी बनवणे हा या संपूर्ण कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

राजगंगा फर्टिलायझर्स अँड केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेडचे अध्यक्ष डॉ. राजेराम घावटे, सीईओ प्रसाद घावटे, संचालक हृषिकेश बत्ते, संचालिका अमृता घावटे, कार्यकारी संचालक तेजस चौधरी व मार्केटिंग संचालक नानासाहेब शेळके तसेच जागो नारी फाउंडेशनचे व्यवस्थापकीय विश्वस्त सीएस मधु त्यागी, पंचशील दूध केंद्राचे व्यवस्थापकीय भागीदार दीपक त्यागी आणि जागो नारी, पढयेगा भारत, गुड की चाय, ई-टेक, प्राणवायू ,हेल्थकेअर, प्रोटॉन कॅन्सर, आयसीयू आणि ओटी) यांचे मुख्य रणनीतीकार राजेश शुक्ला यांच्यासह नॅशनल इंटेलेक्चुअल ॲडव्हायजरीची स्ट्रॅटेजी टीम यांनी या कार्यक्रमाचे नेतृत्व केले.

पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास देशमुख, नॅशनल इंटेलेक्चुअल ॲडव्हायजरीचे मुख्य रणनीतीकार राजेश शुक्ला, माजी खासदार आणि भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष अमर साबळे, माणिकचंद ग्रुपचे सीएमडी प्रकाशशेट धारिवाल, भोसरीचे आमदार महेश लांडगे, सहकार आयुक्त डॉ. दीपक तावरे, व्हेंचर स्टुडिओ कॅपिटलचे व्यवस्थापकीय भागीदार प्रिन्स त्यागी, एमपीएससीचे निवृत्त अध्यक्ष किशोर राजे निंबाळकर, यशदाचे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड आणि पुण्याचे विभागीय कृषी सहसंचालक रफिक नायवडी यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.



जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी गुणवत्तेवर आणि ग्राहकांच्या समाधानावर राजगंगा समूहाचे लक्ष केंद्रित असल्याबद्दल कंपनीचे कौतुक केले. तसेच डॉ. राजेराम घावटे यांच्यासोबतच्या दीर्घकालीन मैत्रीच्या त्यांनी आठवणी जाग्या केल्या. या कार्यक्रमाचा तरुणांवर सकारात्मक प्रभाव होत असल्याचे सांगून त्यांनी समूहाच्या उपक्रमांचे भविष्य आशादायक असल्याचे सांगितले.

यावेळी बोलताना मुख्य रणनीतीकार राजेश शुक्ला म्हणाले, ''नियोजित तारीख आणि वेळेपूर्वी काम पूर्ण करणे ही सर्वात महत्त्वाची गोष्ट असते. गुणवत्ता ही यशाची गुरुकिल्ली असते आणि ग्राहक हा देवा सारखा असतो. ग्राहकांचे समाधान सर्वोपरी असते. व्यवसाय आणि कौटुंबिक गरजांसाठी जेवढे आवश्यक असते त्यापेक्षा जास्त जे काही आपण कमावतो ते आपण समाजाला परत केले पाहिजे. अशा दृष्टिकोनामुळे संपूर्ण परिसंस्थेचा एकत्रित विकास होण्याची हमी मिळते. त्यामुळे शाश्वत वाढ होते आणि प्रत्येकाला लाभ होतो.'' संसाधनांचा कमाल वापर, दीर्घकालीन नियोजन आणि ब्रँडिंग यांच्यासाठी त्यांचे मार्गदर्शन आणि व्हेंचर स्टुडिओ कॅपिटल आणि फिनरिस्क कन्सल्टन्सी यांचा सहयोग खूप महत्त्वपूर्ण ठरले आहेत.

## संक्षीप्त वृत्त

### मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेकरीता जिल्ह्यात साडेचार लाखाहून अधिक अर्ज प्राप्त



**पुणे :** राज्यातील २१ ते ६५ वर्ष वयोगटातील माता-भगिनीचे आर्थिक सक्षमीकरण, स्वावलंबनाला चालना तसेच विविध सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता सुरु करण्यात आलेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण'योजनेकरीता जिल्ह्यात एकूण ४ लाख ९२ हजार ८८८ अर्ज प्राप्त झाले आहेत. या योजनेअंतर्गत ३ जुलैपासून अर्ज स्विकारण्यास सुरुवात करण्यात आली असून २२ जुलैअखेर नागरी क्षेत्रात १ लाख २१ हजार २५४, आंबेगाव तालुक्यात ४८ हजार ८२, शिरुर ४२ हजार २०२, बारामती ३९ हजार ३८२, जुन्नर ३७ हजार ९१७, खेड ३५ हजार ८७१, इंदापूर ३२ हजार ४६१, मावळ २८ हजार २७७, दौंड २६ हजार ७३८, हवेली २५ हजार ५८, पुरंदर २० हजार २४, मुळशी १४ हजार ९४५, भोर १४ हजार ९०८ आणि वेल्हा ५ हजार ५६९ व असे एकूण ४ लाख ९२ हजार ८८८ अर्ज प्राप्त झाले आहेत. या योजनेकरीता 'नारीशक्तीदूत' या मोबाईल ॲपवरुन ऑनलाईन पद्धतीने अर्ज करता येईल. ज्या माता-भगिनीस ऑनलाईन अर्ज करता येत नसेल, त्याच्यासाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया अंगणवाडी केंद्र, बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालये, ग्रामपंचायत, वॉर्ड, सेतू सुविधा केंद्रे येथे उपलब्ध आहे. अर्ज करण्याची प्रक्रिया विनामूल्य आहे. पात्र महिलांना जुलै २०२४ पासूनचा लाभ देण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत अर्ज करण्याकरीता ऑनलाईन व ऑफलाईन अशा दोन्ही प्रकारे सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असून जिल्ह्यातील अधिकाधिक सर्वच पात्र महिलांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत अर्ज करावे. तसेच शासनाच्या अधिकृत मदत केंद्रावरच अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा महिला बालविकास अधिकारी मोनिका रंधवे यांनी केले आहे.

### आयटीआय औंध येथे मराठी लघुलेखन अभ्यासक्रमासाठी ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी ३१ जुलै पर्यंत मुदतवाढ

**पुणे :** शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था औंध येथे सत्र २०२४-२५ करीता मराठी लघुलेखन (स्टेनोग्राफी) या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी ३१ जुलै पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडून या प्रवेशासाठी मान्यता मिळाली असून २४ प्रशिक्षणार्थ्यांची प्रवेश क्षमता आहे. या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सूरू झाली असून **https://msbsvet.edu.in** या लिंकवरुन प्रशिक्षणार्थ्यांना ३१ जुलैपर्यंत ऑनलाईन नोंदणी करता येणार आहे. ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत तसेच प्रवेशाकरीता आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रत उमेदवारांनी संस्थेमध्ये १ ऑगस्ट पर्यंत जमा करणे आवश्यक आहे. उमेदवारांची गुणवत्ता यादी ३ ऑगस्ट रोजी तयार करण्यात येणार असून प्रत्यक्ष प्रवेशाची कार्यवाही ६ ऑगस्ट रोजी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औंध, पुणे येथील मुख्य इमारतीच्या कौशल्य हॉल येथे होणार आहे. प्रवेशित उमेदवारांचे नियमित प्रशिक्षण ७ ऑगस्ट पासून सुरु होणार आहे, अशी माहिती आयटीआयचे उपप्राचार्य ए.ए. साबळे यांनी दिली आहे.

### पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील अनधिकृत जाहिरात फलक ३१ जुलैपर्यंत हटविण्याचे आवाहन

**पुणे :** पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व अनधिकृत व धोकादायक जाहिरात फलक, आकाशचिन्ह, बोर्ड, बॅनर, फ्लेक्स त्वरीत जाहिरात फलक मालक, जागा मालक, विकासक, जाहिरातदार संस्थांना ३१ जुलैपर्यंत हटविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्राच्या हद्दीतील सर्व आकाशचिन्ह, बोर्ड, बॅनर, फ्लेक्सधारक यांनी आतापर्यंत ८५७ प्रस्ताव दाखल केले आहेत. उर्वरित जाहिरात फलकधारकांनी परवानगीकरिता प्रस्ताव दाखल करावेत. विकास परवानगी विभागाने दाखल केलेल्या प्रस्तावापैकी ४१० बोर्ड, बॅनर, फ्लेक्सधारक यांना त्रुटी पुर्ण करण्याकरिता कळविले असून त्रुटी दिलेल्या मुदतीत पूर्ण कराव्यात अन्यथा प्राधिकरणामार्फत निष्कासन करवाई करण्यात येईल. प्राधिकरण कार्यक्षेत्रातील अनधिकृत, धोकादायक आकाशचिन्ह, बोर्ड, बॅनर, फ्लेक्स ३१ जुलैपर्यंत स्वतःहून काढून घ्यावेत अन्यथा ते निष्कासित करण्यात येतील याची संबंधितांनी नोंद घ्यावी, असे पीएमआरडीए अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभागाचे सह आयुक्त अनिल दौंडे यांनी कळविले आहे.

## सर्वसामान्यांना दिलासा; विकसित भारत संकल्पनेला बळ; प्रधानमंत्र्यांनी कोट्यवधी देशवासीयांचा विश्वास ठरविला सार्थ

# ‘नवरत्न’ अर्थसंकल्पात युवा भारताचे प्रतिबिंब : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

II मुंबई : जनमंथन वृत्तसेवा-

कर रचनेत मोठे बदल करून सर्वसामान्यांना दिलासा देत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी कोट्यवधी देशवासीयांचा विश्वास सार्थ ठरविला आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेला अर्थसंकल्प शेतकरी, महिला, युवा, कौशल्य विकास, रोजगार, पायाभूत सुविधांची उभारणी, शहरांचा विकास अशा विविध नऊ घटकांवर लक्ष केंद्रीत करणारा ‘नवरत्न अर्थसंकल्प’ असल्याची प्रतिक्रिया व्यक्त करतानाच युवकांच्या कल्याणासाठी भरीव तरतूद, रोजगाराला चालना देणारा आणि ’विकसित भारत’ संकल्पनेला बळ देणारा असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सांगितले.

### शेतकऱ्यांना बळ

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सलग सातव्यांदा आज केंद्रीय अर्थसंकल्प मांडला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करीत मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, गरीब, महिला, युवा, शेतकरी या घटकांवर भर देतानाच कृषी व संलग्न क्षेत्रांसाठी १.५२ लाख कोटींची तरतूद तसेच शेती क्षेत्रातील उत्पादकता वाढवण्यासाठी डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर पुरविण्याचा निर्णय हा कृषी क्षेत्राबरोबरच शेतकऱ्यांना बळ देणारा आहे. एक कोटी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीसाठी प्रोत्साहन देण्याचा निर्णय हा काळाची गरज असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. राज्य शासनाने देखील महाराष्ट्रात नैसर्गिक शेतीला चालना देण्यासाठी पावले उचलल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

नवीन कर रचना ही सामान्यांना, नोकरदारांना दिलासा देणारी असून त्याचे मी स्वागतच करतो. या नव्या कररचनेमुळे करदात्यांची संख्याही वाढेल. यातून विकासाला आवश्यक असणारे कर संकलनातही महाराष्ट्रात अग्रेसर राहील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

### ग्रामीण भागाचा कायापालट

या अर्थसंकल्पात शेती क्षेत्रातील उत्पादकता, रोजगार व कौशल्य विकास, मनुष्यबळ विकास व सामाजिक न्याय, उत्पादन व सेवा, शहरी विकास, उर्जा संरक्षण, पायाभूत संरचना, संशोधन व विकास, नव्या पिढीतील सुधारणा या नऊ घटकांचा प्रामुख्याने विचार करण्यात आल्याने सर्वसमावेशक असा हा अर्थसंकल्प असल्याचे सांगत ग्रामीण भारताच्या विकासासाठी केलेली २.६६ लाख



कोटी रुपयांची तरतूद खेड्यांचा कायापालट करणारी ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला.

### ५० लाख अतिरिक्त रोजगार

आपला देश युवांचा आहे, असे नेहमी म्हटले जाते. त्याचे प्रतिबिंब आजच्या अर्थसंकल्पात पहायला मिळाले असून युवा वर्गासाठी मोठ्या प्रमाणात तरतुदी करण्यात आल्या आहेत. पहिल्यांदाच रोजगारासाठी तयार झालेल्या युवकांना एक महिन्याचा भत्ता पहिल्या महिन्यात देण्याचा निर्णय हा युवांसाठी दिलासा देणारा आहे. ५० लाख अतिरिक्त रोजगार निर्माण करण्याचा देखील निर्धार अर्थसंकल्पातून करण्यात आला आहे. यामुळे महाराष्ट्रातील युवकांनाही रोजगाराची मोठी संधी निर्माण होणार आहे.

देशातील ५०० अग्रणी कंपन्यांमध्ये युवकांना इंटर्नशिप संधी मिळणार असून पाच वर्षांत सुमारे एक कोटी तरुणांना याचा फायदा होणार आहे. कौशल्य विकासासाठी जाहिर केलेल्या नवीन योजनेद्वारे राज्य सरकार व उद्योगविश्व यांच्या संयुक्त विद्यमातून ५ वर्षांच्या काळात २० लाख युवकांना कौशल्यविकास प्रशिक्षण देण्यात येणार आहे. मुद्रा योजनेतून दुप्पट कर्ज देण्याचा निर्णयही युवांना सक्षम करणारा आहे.

### पायाभूत सुविधांसाठी ११ लाख कोटी

अर्थसंकल्पात पायाभूत सुविधांच्या निर्माणासाठी देखील भरीव तरतूद करण्यात आली आहे. देशात पायाभूत सुविधा उभारणी कामात महाराष्ट्र अग्रेसर आहे. अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा उभारण्यासाठी ११ लाख कोटींची भांडवली तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय पायाभूत सुविधांमध्ये होणाऱ्या खासगी गुंतवणुकीला सरकारी धोरणांमधून प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांच्या कामांना अधिक पाठबळ मिळेल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे. देशभरात रस्ते बांधणीसाठी २६ हजार कोटींचा खर्च केला जाणार असल्याने दळणवळणाचे जाळे मजूबत होणार आहे. देशभरात १२ इंडस्ट्रियल पार्कला नॅशनल इंडस्ट्रियल कॉरिडॉर डेव्हलपमेंट प्रोग्रॅमअंतर्गत मंजुरी देण्याचा निर्णय हा उद्योग क्षेत्राला भरारी देणारा आहे.

देशभरातील २५ हजार गावांसाठी चांगल्या दर्जाचे रस्ते बनवण्यासाठी पंतप्रधान ग्राम सडक योजना टप्पा ४ सुरू करण्याचा निर्णय महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील रस्त्यांच्या विकासासाठी महत्वपूर्ण ठरणार आहे. पीएम सूर्यघर मुफ्त बिजली योजनेद्वारे सौर ऊर्जेला चालना मिळणार असून अर्थसंकल्पातील तरतुदी आणि योजनांमुळे महाराष्ट्राच्या विकासात मोठी भर होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## विकासाला अधिक गती देणारा अर्थसंकल्प - मंत्री सुधीर मुनगंटीवार

II मुंबई : जनमंथन वृत्तसेवा-

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला केंद्रीय अर्थसंकल्प देशाच्या विकासाला अधिक गती देत सामान्यांना दिलासा देणारा आणि काळाभिमुख सुधारणा करतांनाच वित्तीय तूट कमी करणारा असा सर्वसमावेशक अर्थसंकल्प आहे. हा अर्थसंकल्प समाजातील सर्व घटकांना न्याय देणारा, रोजगार निर्मिती बरोबरच शेतीलाही चालना देणारा आणि लोककल्याणकारी आहे, अशी प्रतिक्रिया वने, सांस्कृतिक कार्य आणि मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली आहे.

मंत्री मुनगंटीवार म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशाला विश्वगुरू बनविण्याचे आपल्या सर्वांचे स्वप्न साकार करण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकणाऱ्या या अर्थसंकल्पाचे मी स्वागत करतो. आजच्या अर्थसंकल्पात वित्तीय तूट सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ४.९ टक्के इतकी कमी राखली गेली आहे. देशात विकासात्मक कामांवरील आणि



कल्याणकारी योजनांवरील खर्च वाढत असतांना तूट कमी करण्याचे आव्हान केंद्र शासनाने पेलून दाखवले आहे. आयकराची केलेली पुनर्रचना सर्वसामान्यांना दिलासा देणारी आहे. जीएसटी मध्ये विविध वस्तूंना दिलेली सवलत, आयात व सीमा शुल्कातून विविध अत्यावश्यक औषधांना दिलेली सूट समाधान देणारी आहे. तर मोबाईल फोन, त्याचे सुटे भाग यांच्यावरील घटवलेले कर हे अर्थव्यवस्थेच्या डिजिटायजेशनला अधिक वेग देणारे आहेत, श्री.मुनगंटीवार म्हणाले. या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना मोठा दिलासा देण्यात आला. या अर्थसंकल्पामुळे खते व बी-बियाणे स्वस्त होतील. हा अर्थसंकल्प शेतकऱ्याचे उत्पन्न वाढविण्याच्या दिशेने अधिक दमदार पाऊल टाकणारा आहे. तेलबियांच्या उत्पादनाला दिलेल्या सवलती व चालना दिल्यामुळे देश खाद्यतेल क्षेत्रात स्वयंपूर्ण बनेल असा विश्वास वाटतो. नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्याकरता ग्रामपंचायत पातळीवर दिलेल्या योजना व सवलती हे आपली जमीन, जल व धान्य निर्वीष करणाऱ्या आहेत, असे ते म्हणाले.

आजच्या अर्थसंकल्पात हवाई वाहतूक व जल वाहतुकीला तसेच जहाज व विमान दुरूस्ती व देखभाल या क्षेत्राला प्रोत्साहन देण्याकरता जाहीर केलेल्या योजना देशाला या क्षेत्रात स्वयंपूर्ण बनवत पुढे नेणाऱ्या आहेत. ग्रामीण आणि नागरी भागातील भूमी अभिलेखांचे डिजिटायजेशन तसेच नवीन सर्वेक्षण, त्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यातून जमिनीचा वापर अधिक कार्यक्षमतेने करता येईल, तसेच विकासाचे नियोजन नियंत्रण करणाऱ्या संस्थांना व प्राधिकरणांना अधिक चांगले काम करता येईल, असेही ते म्हणाले.

## तरुणांच्या आकांक्षांना ताकद देणारा अर्थसंकल्प - कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा

II मुंबई : जनमंथन वृत्तसेवा-

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारने आपल्या तिसऱ्या टर्ममध्ये पहिला अर्थसंकल्प आज सादर केला. सदर अर्थसंकल्प हा देशाला विकसित भारताच्या ध्येयाकडे घेऊन जाईल. या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून युवा, महिला, शेतकरी आणि गरीब सक्षम होतील. या अर्थसंकल्पात कौशल्य विकास आणि रोजगाराच्या दृष्टीने जाहीर केलेल्या योजना तरुणांच्या आकांक्षाना ताकद देतील असे मत महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना व्यक्त केले आहे.

मंत्री मंगल प्रभात लोढा म्हणाले, ‘‘मोदी सरकारने रोजगार निर्मिती आणि कौशल्य विकासासाठी विशेष तरतूद केली आहे. पंतप्रधान पॅकेज अंतर्गत



’रोजगार संबंधित प्रोत्साहन’ या योजनेत तीन प्रमुख योजना जाहीर करण्यात आल्या असून, रोजगार, कौशल्य, एमएसएमई आणि मध्यमवर्गावर लक्ष केंद्रित करत सरकारने पाच वर्षांच्या कालावधीसाठी दोन लाख कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या काळात ४ कोटींहून अधिक तरुणांना रोजगार, कौशल्य आणि इतर संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. हा अर्थसंकल्प भारतातील सर्व वर्गांना विशेषतः तरुण पिढीला विकसित बनवणारा अर्थसंकल्प आहे. या महत्त्वकांक्षी अर्थसंकल्पासाठी पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदी आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामणजी यांचे मनःपूर्वक आभार!‘‘

‘‘देशातील २० लाख तरुणांना कौशल्य प्रशिक्षण देण्यात येणार आहे ही अतिशय महत्वाची गोष्ट असून, त्यासाठी कौशल्य प्रशिक्षण संस्थांचे बळकटीकरण करण्यावर देखील भर देण्यात येणार आहे. सोबतच कालानुरूप आवश्यक नवे कौशल्य कोर्सेस सुद्धा सुरु करण्यात येणार आहेत. विकसित भारताच्या ध्येयाकडे वाटचाल करताना महाराष्ट्रात देखील आम्ही आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांची निर्मिती करून, लाखो युवकांना प्रशिक्षण देण्यास सज्ज आहोत. पुढील पाच वर्षात एक करोड तरुणांना देशातील टॉपच्या कंपन्यांमध्ये कौशल्य शिक्षण दिले जाणार आहे, दरमहा ५ हजार रुपये इंटर्नशिप भत्ता आणि ६ हजार रुपयांची एकरकमी मदत दिली जाईल. त्याचप्रमाणे महाराष्ट्रात देखील ’मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून युवकांना विद्यावेतन, प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी तत्पर आहोत. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी १० लाख रुपयांचे कर्ज देण्यात येणार आहे. तसेच मॉडेल स्किल लोन योजनेद्वारे जवळपास २५ हजार तरुणांना ७.५ लाख रुपयापर्यंतचे कौशल विकास शिक्षणासाठी कर्ज दिले जाणार आहे.

केंद्र सरकार आणि राज्य सरकार, तरुणांच्या विकासासाठी एकाच दिशेने प्रयत्न करत असल्याने त्याचा दुप्पट लाभ महाराष्ट्रातील तरुणांना होईल!‘‘ असे देखील कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी यावेळी बोलताना सांगितले.

## केंद्रीय अर्थसंकल्पात पुणेकरांच्या हाती भोपळा

### मध्यमवर्गीय नोकरदारांचा भ्रमनिरास - माजी आमदार मोहन जोशी

II पुणे : जनमंथन वृत्तसेवा-

केंद्र सरकारच्या अंदाजपत्रकात पुणेकरांसाठी कोणताही नवीन प्रकल्प न देता, मेट्रो आणि नदी सुधारणा यासाठी तुटपुंज्या तरतुदी करून हाती भोपळा दिला आहे, अशी प्रतिक्रिया प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष, माजी आमदार मोहन जोशी यांनी दिली आहे.

पुण्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम होऊन वाहतुकीच्या कोंडीतून मुक्तता करण्यासाठी मेट्रो प्रकल्पाचा पहिला टप्पा यापूर्वीच पूर्ण व्हायला हवा होता. काँग्रेस सरकारने पुणे मेट्रो प्रकल्पासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या २०१२ सालीच दिल्या होत्या. २०१४ साली केंद्रात भाजप सरकार आले. भाजपचे तत्कालीन खासदार आणि अन्य नेत्यांच्या वादात हा प्रकल्प तीन वर्षे लांबला. या काळात हजारो कोटी रुपयांनी खर्च वाढला. पंतप्रधान मोदी यांनी मेट्रोतून प्रवास करून उदघाटनाचा स्टंट केला मात्र कामाला गती मिळालेली नाही. आज मांडलेल्या अर्थसंकल्पात मेट्रो साठी ८०० कोटीची



तुटपुंजी तरतूद करून पुणेकरांच्या तोंडाला पाने पुसली आहेत. मेट्रो प्रकल्पाचा उपनगरांमधील विस्तार लांबणीवर पडणार आहे. सार्वजनिक वाहतूक सेवा सक्षम करण्यासाठीची राजकीय इच्छाशक्तीच भाजपकडे नाही, असे मोहन जोशी यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. शहराचे आरोग्य, पर्यावरण रक्षणासाठी मुळा-मुठा नदी सुधार योजना राबविणे आवश्यक आहे. पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते या ही योजनेचे उदघाटन झाले पण, गेल्या पाच वर्षात वीटही हललेली नाही. पाच हजार कोटीहून अधिक खर्च असणाऱ्या या प्रकल्पाकरिता केवळ सहाशे कोटींची तरतूद करून धूळफेक केली आहे.

शहराच्या जुन्या हद्दीतील सांडपाणी प्रक्रियेसाठी असलेला जायका प्रकल्प, विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार, ऐतिहासिक वास्तूंचे जतन, पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे या प्रकल्पांसाठी कोणतीही तरतूद केलेली नाही. नवे प्रकल्पही सुचवलेले नाहीत, पुणेकरांसाठी पोकळ घोषणाबाजी केलेले अंदाजपत्रक मांडण्यात आले आहे, अशी टीका मोहन जोशी यांनी केली आहे.

मध्यमवर्गीय आणि नोकरदारांची घोर निराशा अंदाजपत्रकात करण्यात आली आहे. महागाईच्या काळात करसवलत अपेक्षित होती. ३ लाखांच्या उत्पन्नावर शून्य टक्के टॅक्स, ही मर्यादा ७ लाखांपर्यंत वाढवायला हवी होती. मध्यवर्गीयांची तशी मागणीही होती. तसेच ७ ते १० लाखांच्या उत्पन्नावर १० टक्के टॅक्स आकारला जाणार आहे, तो ५ टक्केच हवा होता. सामान्य करदात्याला अर्थसंकल्पात दिलासा दिलेला नाही. या उलट कराचा बोजाच पडण्याची शक्यता अधिक आहे, असे मोहन जोशी यांनी पत्रकात म्हटले आहे.

## दुर्बल, वंचित, उपेक्षित, मागास, अल्पसंख्याक घटकांच्या विकासावर भर देणारा लोककल्याणकारी अर्थसंकल्प : उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार

II मुंबई : जनमंथन वृत्तसेवा-

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सलग तिसऱ्यांदा सत्तेवर आलेल्या एनडीए सरकारचा अर्थसंकल्प महाराष्ट्र आणि देशवासियांची मने जिंकणारा अर्थसंकल्प ठरला आहे. मध्यमवर्गीय आणि नोकरदार वर्गाच्या आशा-आकांक्षा-अपेक्षांची पूर्तता करणारा, शेती, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य, सहकार, रोजगार, स्वयंरोजगार, विज्ञान, संशोधन, कौशल्यविकास, सामाजिक न्याय, महिला सक्षमीकरण अशा सर्व क्षेत्रांच्या विकासाला बळ देणारा, मजबूत-विकसित भारताची पायाभरणी करणारा, देशाला विश्वशक्ती बनवण्याच्या मार्गावर नेणारा हा अर्थसंकल्प आहे. शहरी व ग्रामीण विकासाचा समतोल साधणारा, समाजातील दुर्बल, वंचित, उपेक्षित, मागास, अल्पसंख्याक घटकांच्या विकासावर भर देणारा एक चांगला, दूरदृष्टीपूर्ण, लोककल्याणकारी अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो, अशा शब्दात उपमुख्यमंत्री तथा



अर्थमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय अर्थसंकल्पाचे स्वागत केले आहे.

केंद्रीय अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना, उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री पवार म्हणाले की, देशाला विकसित राष्ट्र, विश्वशक्ती बनविण्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे स्वप्न आहे. स्वातंत्र्याच्या शतकमहोत्सवाआधी हे स्वप्न पूर्ण करायचे आहे. या स्वप्नपूर्तीसाठी दूरदृष्टीने हा अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे. १) शेती क्षेत्रात उत्पादकतावाढ, २) रोजगार, स्वयंरोजगार, कौशल्यविकासावर भर, ३) मनुष्यबळ विकास व सामाजिक न्यायाकडे विशेष लक्ष, ४) उत्पादन व सेवाक्षेत्राचा विकास ५) शहरांच्या नियोजनबद्ध विकासावर भर, ६) ऊर्जासंरक्षण ७) पायाभूत सुविधांचा विकास ८) संशोधन व विकासाला प्राधान्य, ९) नव्या पिढीसाठी सुधारणा या नऊ क्षेत्रांना दिलेले प्राधान्य देशाच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा, देशाला सर्व क्षेत्रात पुढे घेऊन जाणारा निर्णय आहे. शेती व संलग्न क्षेत्रांसाठी १.५२ लाख कोटींची केलेली तरतूद महत्वाची आहे. त्यातून शेती क्षेत्रासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यात येणार आहे. कमी खर्चात, अधिक उत्पादन देणाऱ्या शास्त्रशुद्ध शेतीचा प्रचार-प्रसार देशाच्या शेतीक्षेत्राला आणि शेतकऱ्यांना बळ देणारा ठरेल. प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेची मुदत पाच वर्षांसाठी वाढविण्यात आली आहे. त्यामुळे देशातील ८० कोटी नागरिकांना अन्नसुरक्षा मिळणार आहे. युवकांना शिक्षण, रोजगार आणि कौशल्य विकासासाठी १.४८ लाख कोटींची तरतूद केली आहे. त्यातून येणाऱ्या ५ वर्षात २० लाख युवकांना कौशल्यविकासाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. ‘ईपीएफओ’मधील नोंदणीवर आधारित योजनेंतर्गत, पहिल्यांदाच रोजगारासाठी तयार झालेल्या युवकांना एक महिन्याचा भत्ता पहिल्या महिन्यात दिला जाणार आहे. २१ कोटी युवकांना याचा फायदा होणार आहे. पुढील पाच वर्षात देशातील ५०० कंपन्यांमध्ये किमान १ कोटी युवकांना इंटर्नशिपची संधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. देशात १२ इंडस्ट्रीयल पार्क उभारण्यात येणार आहेत. त्याचा फायदा महाराष्ट्रालाही होईल असा मला विश्वास आहे, असेही अर्थमंत्री पवार म्हणाले. रुग्णांसाठी महत्त्वाच्या असलेल्या काही औषधांना अबकारी शुल्कातून वगळण्याचा निर्णय असेल, मोबाईल चार्जर आणि इतर गोष्टींवरील अधिभार १५ टक्क्यांनी कमी करण्याचा निर्णय असेल, लिथियम बॅटरी स्वस्त करण्याचा निर्णय असेल, पीएम आवास शहरी योजनेंअंतर्गत शहरात राहणाऱ्या एक कोटी गरीब नागरिकांना १० लाख कोटी रुपये खर्चून बांधून देण्याचा निर्णय व त्यासाठी पुढील पाच वर्षात २.५ लाख कोटी रुपयांची मदत देण्याचा निर्णय सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देणारे ठरतील, असेही उपमुख्यमंत्री पवार म्हणाले.

## राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन सन्मान योजना

# ३१ जुलैपर्यंत लाभार्थ्यांनी आधार पडताळणीचे सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे आवाहन

II मुंबई : जनमंथन वृत्तसेवा-

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाअंतर्गत राजर्षी शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व कलावंत योजनेअंतर्गत साहित्य आणि प्रयोगात्मक कलेच्या क्षेत्रातील पन्नास वर्षावरील ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत यांना मानधन देण्यात येते. या योजने अंतर्गत ३४ हजार ६०० कलाकार व साहित्यिक यांचा समावेश असून त्यांना एप्रिल २०२४ पासून सरसकट ५ हजार रुपये एवढे मानधन देण्यात येत आहे. ही प्रत्यक्ष लाभाची योजना असल्यामुळे, प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण (डीबीटी) प्रणाली द्वरेच मानधन अदा करण्याबाबत राज्य शासनाचे धोरण आहे. त्यानुसार, राज्यातील या योजनेचा लाभ घेणाऱ्या ज्या लाभार्थ्यांची आधार पडताळणी राहिली असेल, त्या सर्व लाभार्थ्यांनी ३१ जुलै २०२४ पर्यंत त्यांची आधार पडताळणी करून घ्यावी, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाने केले आहे.

आतापर्यंत या योजनेतील १७ हजार ३५० लाभार्थ्यांनी आधार पडताळणी पूर्ण केलेली आहे. ज्या लाभार्थ्यांनी आधार पडताळणी केलेली आहे. त्यांना माहे मे महिन्याचे मानधन डीबीटीमार्फत देण्यात आलेले आहे. ज्यांची आधार पडताळणी झालेली नाही त्या कलाकारांना विशेष बाब म्हणून मे महिन्याचे मानधन अदा करण्यात आले होते. प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण (डीबीटी) प्रणाली द्वरे मानधन दिल्यामुळे कलाकारांना मानधन मिळण्यात कालापव्यय होणार नाही, लाभार्थ्यांना मानधनाबाबतची माहिती, मानधन मिळण्याच्या अगोदर व मानधन मिळाल्यानंतर मोबाईलवर संदेशाच्या रूपाने वेळोवेळी देता येईल, मानधन रक्कम खात्यात जमा होताना कोणतीही तांत्रिक चूक होणार नाही. मानधन मिळाले नाही किंवा परत गेले अशा प्रकारच्या बाबी घडणार नाहीत.

प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण (डीबीटी) प्रणाली अंतर्गत आधार क्रमांकाची पडताळणी करणे ही वैयक्तिक लाभार्थ्यांचीच जबाबदारी आहे, कारण अन्य कोणतीही व्यक्ती अशा प्रकारची पडताळणी करू शकत नाही. त्यामुळे सर्व लाभार्थ्यांनी मोबाईल वरून किंवा सेतू सुविधा केंद्रातून आधार पडताळणी करणे आवश्यक आहे. आधार पडताळणी करण्याआधी लाभार्थ्यांनी आपला मोबाईल क्रमांक आधार क्रमांकाला जोडणे आवश्यक आहे. आधार पडताळणी करण्यासाठी हींींिं://ारहरज्ञरश्रीरपारप.ेॲस/अरवहरॲतशॲळषळलरींळेप.रीु ही लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे. जिल्हास्तरावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत विभाग जिल्हा परिषद हे या समितीचे सदस्य सचिव असल्याने; ग्रामपंचायत किवा पंचायत समिती स्तरावरूनही याबाबत आपणास माहिती मिळू शकेल. यापुढे, ज्या कलाकारांची आधार पडताळणी झालेली आहे. अशा कलाकारांच्या खात्यात विहित वेळेत मानधन जमा करण्यात येईल. ज्या कलाकारांची आधार पडताळणी प्रलंबित आहे त्यांना मानधन जमा होण्यास विलंब लागू शकतो. आधार पडताळणी करण्याबाबत काही अडचणी आल्यास, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई तसेच पुणे/ नागपूर/ छत्रपती संभाजीनगर या विभागीय कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. आधार पडताळणीसंदर्भात अडचणींसाठी खालील क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**मुंबई कार्यालयातील संपर्क क्रमांक** – दूरध्वनी क्र. ०२२- २२८४२६३७०, ०२२- २२०४३५५०. श्रीराम पांडे, सहसंचालक मो. ९४२१६४२६५१, संदीप बलखंडे, सहायक संचालक मो. ९७६३०६८०८३. जयश्री घुगे, कार्यक्रम अधिकारी मो. ९००४११५०८६, अक्षता बिर्जे अधीक्षक मो. ९८६९८३४९४६, पल्लवी कदम, उच्चश्रेणी लघुलेखक मो. ७५०७८७४९३० **पुणे विभागीय कार्यालय** – श्वेता पवार, सहायक संचालक, मो. ९०२८९१२८३८. जान्हवी जानकर, अधीक्षक, मो. ९५४५४१४३४३, नरेंद्र तायडे, सहायक लेखा अधिकारी मो.९४२३११४४९९ **नागपूर विभागीय कार्यालय** – संदीप शेंडे, सहायक संचालक- मो.९४२१७८२८४८, प्रज्ञा पाटील, सहा. लेखा अधिकारी – ८९२८१३०६२२ **छत्रपती संभाजीनगर विभागीय कार्यालय** – संदीप शेंडे, सहायक संचालक- मो.९४२१७८२८४८. सुर्यकांत ढगे, सहा. लेखा अधिकारी-९८२२३३४३२१.

## संक्षीप्त वृत्त

### लोकमान्य टिळकांच्या जयंतीनिमित्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मंत्रालयात अभिवादन



**मुंबई :** लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अभिवादन केले.

यावेळी आमदार आशुतोष काळे,आमदार अमर काळे, सामान्य प्रशासन विभागाचे उपसचिव दीपक मोरे, सहायक कक्ष अधिकारी राजेंद्र बच्छाव, नितीन राणे, विजय शिंदे, आदीसह मंत्रालयातील अधिकारी, कर्मचारी यांनीही लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

### राज्यपालांचे लोकमान्य टिळक यांना अभिवादन



**मुंबई :** लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या १६८ व्या जयंतीनिमित्त राज्यपाल रमेश बैस यांनी मंगळवारी (दि. २३) राजभवन येथे लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले. यावेळी राजभवनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी देखील लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेला अभिवादन केले.

### महापालिकेच्या वतीने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना अभिवादन



**पिंपरी :** ‘‘स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच’’ अशी क्रांतिकारी गर्जना करणारे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी स्वातंत्र्यपुर्व काळात पत्रकारितेच्या माध्यमातून देश स्वतंत्र करण्यासाठी सामाजिक आणि राजकीय चळवळी उभ्या केल्या आणि लोकांमध्ये देशप्रेम निर्माण केले, असे मत अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी व्यक्त केले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीनिमित्त निगडी येथील पुतळ्यास अतिरिक्त आयुक्त इंदलकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. अभिवादन प्रसंगी जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, माजी नगरसेवक अमित गावडे तसेच महापालिका कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.

### राज्यपालांच्या उपस्थितीत राजभवनातील श्रीगुंडी यात्रेचा शुभारंभ



**मुंबई :** राज्यपाल रमेश बैस यांनी राजभवनात श्रीगुंडी देवीची पुजा केली. त्यानंतर एक दिवसाच्या श्रीगुंडी यात्रेचा प्रारंभ केला. राज्यपाल बैस यांनी मंदिर परिसरातील महालक्ष्मी, महादेव, प्रभू श्रीराम व हनुमान यांच्या मूर्तींचे दर्शन घेतले.

### परवाना जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे पती (नाव) **कै. नरेश बाबू कोळी** यांचे दिनांक १९/०३/२०२३ रोजी निधन झाले आहे. त्यांच्या नावे प्रादेशिक कार्यालय, पुणे येथे नोंद असलेली ऑटो रिक्षा वाहन क्रमांक : **MH 12 NW 8763,** व त्यावरील परमिट क्रमांक : **MH/12/CC/AUTO/2018/12104** तसेच चेसिस क्र. : **MD2A27AY9JWK38269** व इंजन क्र.: **AZYWJK00757** अशी आहेत. तरी त्याच्या पश्चात कायदेशीर वारसदार म्हणून मी त्यांची पत्नी (नाव) : **सुरेखा नरेश कोळी** याद्वारे असे कळविते की, उपरोक्त वाहन व परमिट माझ्या नावावर करण्याकरिता प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे अर्ज करीत असून सोबत कोणाची तक्रार नसल्याचे हमीपत्र देत आहे.

याबाबत कोणाची काही हरकत, सबब, तक्रार असल्यास त्या संबंधीत व्यक्तीने प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांत पुराव्यासह समक्ष अथवा लेखी कळवावे. अन्यथा ह्याबाबत कोणाचीही हरकत नाही असे समजून वरील वाहन व परमिट माझे नावे हस्तांतरीत करण्यात येईल व त्यांनतर कोणाचीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**कळावे हे जाहीर नोटीस.**
**आज दिनाक :** २४/०७/२०२४
**स्थळ :** पुणे

**अर्जदार : सुरेखा नरेश कोळी (पत्नी)**
**पत्ता : रेल्वे गेट नं. २०, रूम नं. ८, मुंबई – पुणे हायवे, अनुपम नगरी समोर, खडकी, बोपोडी, पुणे – ४११००३**

दैनिक जन मंथन

**दैनिक जन मंथन** हे मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक **समीर आजमतुल्ला खान** यांनी **समीर पब्लिकेशन अँड प्रिंटर्स**, स. नं. ३७/२, स्टार पॅलेस बिल्डिंग, ऑफिस क्र. १, रामनगर सोसायटी, अंजली इंग्लिश शाळा जवळ, वडगांवशेरी, पुणे – ४११०१४ येथे छापून **दैनिक जन मंथन कार्यालय :** स. नं. ३७/२, स्टार पॅलेस बिल्डिंग, ऑफिस क्र. १, रामनगर सोसायटी, अंजली इंग्लिश शाळा जवळ, वडगांवशेरी, पुणे – ४११०१४ येथून प्रकाशित केले. • **संस्थापक व संपादक :** समीर आजमतुल्ला खान • **मो. नं.** ९०२८७४७५२८ • **मुख्य संपादक :** आजमतुल्ला मोहम्मदअली खान • **मो. नं. :** ९७६३१९९९१७ • **E-Mail :** dailyjanmanthan@gmail.com ***(या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही, सर्व वाद-विवाद पुणे न्यायकक्षेत.)**
**Daily Jan Manthan** newspaper is Printed, Published and Owned by **Mr. Samir Ajmatulla Khan, Printed at :** Sr. No. : 37/2, “Star Palace” Building, Office No. : 1, Ramnagar Society, Wadgaon Sheri, Pune - 411014 Maharashtra, and **Published at :** Sr. No. : 37/2, “Star Palace” Building, Office No. : 1, Ramnagar Society, Wadgaon Sheri, Pune - 411014 Maharashtra. • **Founder & Editor :** Mr. Samir Ajmatulla Khan • **Mob. No. :** 9028747529 • **Chief Editor :** Ajmatulla MohammadAli Khan • **Mob. No. :** 9763199917 • **E-Mail :** dailyjanmanthan@gmail.com • **R.N.I. No. : MAHMAR/2010/35960** • **Declaration No. : SDM/HAVELI/SR/64/2019** ***(Note : According to the PRB Act, it is the responsibility of the Editor. The Editor/Publisher do not necessarily agree with every news, article and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Pune Court.)**